म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय ........ नाटके

दा. क्र. २८५९७

IRBK-0119714

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

1 1 NOV 1996

1 NOV 1999

19 DEC 2000

10 JUL 2003

6 MAR 2004

(कृ.मा.पहा.)

१६०००/११-९५

वाचनालय
नाटक
१९७१४
७।५।८३

IRBK 0119714
IRBK-0119714

# अश्वमेध

रत्नाकर मतकरी

श्री विशाखा प्रकाशन, पुणे ३०

प्रकाशक :

राजा फडणीस
श्री विशाखा प्रकाशन
५८ शनिवार पेठ, पुणे ३०

मुद्रक :

सौ. कमल रामचंद्र बळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ :

जयंत ताडफळे

© सौ. प्रतिभा मतकरी

प्रथमावृत्ती : ३१ ऑगस्ट ८० : मूल्य नऊ रुपये

वा. १८८१४ दि. ८।५।८३
वि. नाटक

## रत्नाकर मतकरी यांची प्रकाशित नाटके

| | |
|---|---|
| वाऱ्यावरचा मुशाफिर | १९५९ |
| वर्तुळाचे दुसरे टोक | १९६० |
| ब्रह्महत्या | १९६७ |
| बिऱ्हाड वाजलं | १९७२ |
| प्रेम कहाणी | १९७२ |
| आरण्यक | १९७४ |
| समोरच्या घरांत | १९७७ |
| अजून यौवनात मी | १९७९ |
| लोककथा '७८ | १९७९ |

## अश्वमेध

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | रत्नाकर मतकरी |
| दिग्दर्शक | : | अरविंद देशपांडे |
| नेपथ्य, प्रकाशयोजना | : | बाबा पार्सेकर |
| संगीत | : | शांक–नील |
| ध्वनिमुद्रण | : | शशांक लालचंद |
| ध्वनिसंयोजन | : | प्रकाश सावंत |
| रंगभूषा | : | वर्दम मेकअप सर्व्हिस |
| छायाचित्रे | : | प्रकाश फोटो स्टुडिओ |
| निर्मितिप्रमुख | : | अरविंद चित्रे |
| सूत्रधार | : | गोट्या सावंत |

'अश्वमेध' या नाटकाचा पहिला प्रयोग महाराष्ट्र दिन, गुरुवार दिनांक १ मे १९८० रोजी दुपारी ४ वाजता साहित्य संघ मंदिर, गिरगाव, येथे सादर करण्यात आला.

---

## भूमिका

गिरीश : श्रीकांत मोघे
अपर्णा : भावना
रेजी : प्रफुल्ल वायंगणकर
अंजली : पद्मश्री जोशी
रंगास्वामी : सुधीर जोशी
रमाकांत : विनय आमडेकर
नयन : डॉ. ज्योत्स्ना कार्येकर/सोनाली जोशी
नितीन : अनंत जोग
गोपीनाथ : लक्ष्मीकांत बेर्डे
बॅनर्जी : मधुकर नाईक
मणी दलाल : अजय वढावकर

**: निर्मिती :**

नाट्यसुमन, मुंबई

# लेखकाचे मनोगत

श्री. शंकर यांच्या ‘ सीमाबद्ध ’ या उत्कृष्ट कादंबरीचं मराठी भाषांतर श्री. अशोक शहाणे यांनी ‘ मर्यादित ’ या नावानं तितकंच तोलामोलानं केलंय. या कादंबरीमध्ये मला ‘ अश्वमेध ’चं बीज सापडलं. ते सामाजिक महत्त्वाचं वाटलं. वाटलं अशा विषयांवर आपल्याकडे नाटकं यायला हवीत. आपल्याकडे नाटकांत सहसा एखाद्या विशिष्ट व्यवसायाचं वास्तववादी वातावरण उभं केलेलं नसतं. तेही या निमित्तानं साधेल असं वाटलं म्हणून ‘ अश्वमेध ’ लिहिलं. मराठी प्रेक्षकांनी आणि समीक्षकांनी त्याचं जे स्वागत केलं, त्यावरून माझा तर्क खरा ठरला.

कथाबीज ‘ सीमाबद्ध ’मध्ये मिळालं, तरी नाटकाची उभारणी स्वतंत्रपणंच केलीय. मूळ कादंबरीत ‘ मेहुणी ’ या पात्राचा उपयोग अशा रीतीनं केलेला नाही. रंगास्वामीच्या ऐवजी दोनचार वेगवेगळ्या व्यक्तिरेखा आहेत. अर्थातच नितीन, गोपीनाथ हे तर मी संपूर्णपणं स्वतंत्रच लिहिलेले आहेत. अर्थातच या सत्यामुळं प्रसंग, स्थळं आणि इतर तपशील बराच वेगळा झालाय.

‘ गोपीनाथ ’विषयी थोडंसं. हे पात्र इतकं त्रोटक का, अशी एक शंका. दुसरी, त्याच्या भावविवशतेविषयी. याचं स्पष्टीकरण एवढंच की, हे पात्र म्हणजे खरीखुरी ‘ व्यक्तिरेखा ’ नव्हेच. ते एक प्रतीक आहे, तत्त्व आहे; गिरीशची सदसद्विवेकबुद्धी म्हणा हवी तर! मग तो इतर पात्रांसारखा नाटकभर कसा येईल? तो एक गिरीशच्या आशंकेच्या वेळी, त्याला टोचणी लागली असतानाच दिसणार, आणि भावविवशच होणार! हे लक्षात घेतलं नाही तर मात्र तो त्रोटक किंवा मेलोड्रॅमॅटिक वाटेल.

दुसरं एक विचारलं गेलं. अशा प्रकारच्या वैचारिक विषयाची व्यावसायिक चौकटीमध्ये गळचेपी होत नाही का? काही अंशी होते. कारण त्याला एक सोपेपणा येतो, काही भागात ठळकपणा आणावा लागतो. परंतु तरीही त्या निमित्तानं एखादा विचार अधिक मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोचतो, हा फायदा. शिवाय विषयांची व्याव-सायिक–प्रायोगिक अशी मांडणी करणं म्हणजे सध्या रंगभूमीच्या या दोन दालनांमध्ये विनाकारण पडलेली दरी अधिक रुंदावण्यासारखं आहे. व्यावसायिक नाटकाच्या कक्षा मान्य करूनही जेव्हा वेगळया विषयांवर नाटकं लिहिली जातील तेव्हाच रंगभूमीचा चेहरामोहरा बदलता राहील, तिला साचलेपण येणार नाही. तिची चौकटही मग हळूहळू शिथिल होत जाईल.

अर्थात व्यावसायिक नाटकाच्या कक्षा रुंदाव्यात, यासाठी निर्मातेही उत्सुक हवेत. ज्यांत विचारमंथन आहे, अशा नाटकाला मराठी प्रेक्षक आणि समीक्षक दाद देतात, परंतु पुष्कळदा निर्मातेच त्याविषयी साशंक असतात. 'धंद्याची नाटकं ती वेगळी' अशी चुकीची समीकरणं मांडून प्रेक्षकांच्या अभिरुचीविषयी अविश्वास दाखवतात.

सुदैवानं 'नाट्यसुमन'ची निर्माती अभिनेत्री भावना आणि दिग्दर्शक श्री. अरविंद देशपांडे यांनी 'अश्वमेध'चं महत्त्व आणि सामर्थ्य सुरुवातीलाच मान्य केलं आणि त्यावर मेहनत केली. त्याबद्दल त्यांचे आणि ते रंगभूमीवर साकार करणाऱ्या सर्व कला वंतांचे (विशेषतः गिरीशची कठीण भूमिका तन्मयतेनं करणारे श्री. श्रीकांत मोघे यांचे) मनःपूर्वक आभार!

मुंबई

— रत्नाकर मतकरी

## अश्वमेध

अंक तीन प्रत्येक अंकांत दोन प्रवेश.
दर अंकांत दोन प्रवेशांमध्ये–
–एक टेलिफोन संभाषण.
सर्व घटना गिरीश पोतदारांच्या–
–दिवाणखान्यात घडतात.
कालमान : चौदा दिवस : ३ ते १६ मार्च.

९८७९४ ७।५।८३
नाटक

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

रविवार, ३ मार्च : दुपार.

'ब्लू स्टोन' अपार्टमेन्टस्. भलत्याच बड्या लोकांची ही वसाहत. या वसाहतीच्या दहाव्या मजल्यावरचा एक आलिशान फ्लॅट. त्या फ्लॅटचा दिवाणखाना. अगदी दर्शनी जागी बदलत्या ठळक तारखांचं एक कॅलेंडर. शिवाय झुंबरापासून कार्पेटपर्यंत आणि टी. व्ही.पासून ॲक्वेरियमपर्यंत साऱ्या गोष्टींनी दिवाणखाना राजेशाही सजवलेला. कारण भारत मॅकिकन कंपनी या इंडो-ब्रिटिश फर्मच्या एका एक्झिक्यूटिव्हचा हा फ्लॅट. त्यामुळं सगळा खर्च कंपनीनं केलेला. कंपनीच्या नि एक्झिक्यूटिव्हच्या स्टेटस्-प्रमाणं.

भारत मॅकिकनच्या एक्सपोर्ट डिपार्टमेन्टचा मॅनेजर आणि या फ्लॅटचा सध्याचा मालक– गिरीश पोतदार! मराठी माणूस असला तरी अंगच्या हुशारीनं चाळिशीच्या आतच या पदावर जाऊन पोचलेला. अजून पुढं जायची महत्त्वाकांक्षा ठेवणारा. देखणा, कर्तबगार, विलक्षण बुद्धिमान असा हा तरुण.

आज रविवार. सकाळ उलटून गेली आहे. साडेअकरा– बाराचा सुमार. गिरीश रेसच्या पुस्तकात डोकं खुपसून बसला आहे. आवड म्हणून नाही, पण जे काय करायचं ते व्यवस्थित, आणि अभ्यासूपणं करावं ही त्याची पद्धत. तेव्हा आज रेसिसना जायचं तर रेसच्या पुस्तकाचा अभ्यास करणं ओघानंच आलं!

पलीकडे खिडकीशी त्याची पत्नी अपर्णा. एक्झिक्यूटिव्हच्या बायकोला शोभेल असं बुद्धिमान आणि कार्यक्षम व्यक्तिमत्त्व. सौन्दर्य काळजीपूर्वक राखलेलं. बोलण्यात एक प्रकारचा उद्धट गोडवा. तिची ही वेळ खरं तर विश्रांती–'ब्यूटी स्लीप' घेण्याची. पण तिची धाकटी बहीण यायचीय आज

बेळगावहून. म्हणून अपर्णानं मघापासून स्वतःला खिडकीत टांगून घेतलंय्.

**अपर्णा :** अजून कशी आली नाही रे ही ?

**गिरीश :** येईल. सलीम गेलाय गाडी घेऊन स्टेशनवर!

**अपर्णा :** त्याला किती वेळ झाला!

**गिरीश :** गाडी लेट असेल एखाद वेळी.

**अपर्णा :** दॅटस् व्हाय आय हेट दीज ट्रेन्स.

**गिरीश :** (हसून) तू जातेस कधी ट्रेननं ? ऊठसूठ प्लेन– फार झालं तर कार.

**अपर्णा :** मग ? भारत मॅकिकन सारख्या फॉरिन कन्सर्नच्या एक्झिक्यूटिव्हची बायको मी– मी ट्रेननं प्रवास करू ? शोभेल का ते कंपनीच्या डिग्निटीला ?

**गिरीश :** एक्झिक्यूटिव्हची मेहुणी आलेली चालते वाटतं ट्रेननं ?

**अपर्णा :** आता येऊ दे अंजूला. अशी बदलून टाकते, की पंधरवड्यानं परत जाताना ट्रेनचं नाव घ्यायची नाही!

**गिरीश :** टाकशील बदलून! मला नाही का बदलून टाकलंस ?

**अपर्णा :** तुला ? आणि मी बदललं ? यू आर जोकिंग. तुला बदललं तुझ्या कंपनीनं. मी काय बापडी करणार ? तू माझं काही तरी ऐकतोस का ?

**गिरीश :** म्हटलं– भारत मॅकिकनचे एक्झिक्यूटिव्हज् बायकोच्या तंत्रानं वागणारे असून चालत नाहीत.

**अपर्णा :** ऐकवलंयस ते मला हजारदा!

**गिरीश :** –आणि असं असूनही मी तुझं सारं काही ऐकतो! काय करणार ? प्रेम-विवाह करून फसलो ना!

**अपर्णा :** उजेड पडला प्रेमविवाहाचा! स्वतःच्या सोयीचं असेल तेव्हाच ऐकतोस तू माझं! नाही तर तो रमाकांत लवंगे बघ– प्रत्येक गोष्टीत बायकोचा सल्ला घेतो.

**गिरीश :** मी तसं केलेलं आवडेल तुला ?

**अपर्णा :** नाही रे बाबा. मुळीच ऐकू नकोस माझं.—फक्त एकच कर माझ्यासाठी. लौकर एकदा बोर्ड ऑफ डिरेक्टर्समध्ये जा म्हणजे झालं.

**गिरीश :** अग, कंपनीचा डिरेक्टर व्हायचं म्हणजे ते काय नवी कार घेण्यासारखं आहे ? तीसुद्धा आधी बुक करावी लागते.

**अपर्णा :** डिरेक्टरचा एक्झॅक्ट पगार काय असतो रे ?

**गिरीश :** सात हजार. शिवाय प्रॉफिटवर कमिशन. सगळं धरून वर्षाला साधारण सव्वा लाख!

**अपर्णा :** सव्वा लाख ? आणि आत्ता तुला किती मिळतात ? जेमतेम वर्षाला साठ हजार!

उतरली गाडीतून. जरा थकल्यासारखी वाटतेय का रे ?

**गिरीश :** ( चावटपणे ) असेल. पण सुंदरच दिसतेय.

**अपर्णा :** गिरीश ! अशानं मी तिला आत्ताच्या आत्ता परत जायला सांगेन हं.

**गिरीश :** अग पण तिला वर तरी येऊ दे !

**अपर्णा :** (एकदम) ए, हॉल नीट आहे ना रे ? ( उगाच एखाददुसरी वस्तू इकडे तिकडे करीत ) सकाळी लावलंय जमुनानं. पण तरी आपलं- अंजूचं फर्स्ट इंप्रेशन असं व्हायला हवं ! एकदम थक्क झाली पाहिजे ती आपलं घर पाहून !

**गिरीश :** काही तरीच तुझं ! ती तुला भेटायला येणाराय की घर पाह्यला ?

**अपर्णा :** खरं सांगू ? घर करायला !

**गिरीश :** म्हणजे ?

**अपर्णा :** म्हणजे शक्य तर तिचं लग्न जमवायचंय आपल्याला ! लक्षात आहे ना ? आईनं पत्रात काय लिहिलंय ? अंजूसाठी चांगला मुलगा पाहणे !

**गिरीश :** ओ गॉड ! कुठला रसिक माणूस आपल्या हातानं आपल्या मेहुणीचं लग्न जमवील ? त्यातूनही इतक्या सुंदर मेहुणीचं ?

**अपर्णा :** थांब तू. नंतर चांगला समाचार घेते......( दाराशी जाते. आनंदानं ओरडते. ) अंजू ऽ ( मग अंजलीला गच्च मिठी मारून घेऊन येते. मागं बॅग घेऊन रेजी. )

( अंजली अपर्णापेक्षा बरीच लहान, पण कांकणभर अधिकच देखणी. मात्र किती तरी साधी. तिनं खांद्याला एक पिशवी अडकवलीय. रेजी बॅग घेऊन आत जातो. अंजली गिरीशला पाहून नमस्कार करते. )

**अंजू :** नमस्का ऽ र !

**गिरीश :** बुहिणीला एवढी गच्च मिठी—आणि आम्हांला मात्र एवढ्या अंतरावरून ‘ नमस्का ऽ र ’ ! काय हा भेदभाव !

**अंजू :** ( खळखळून हसत ) गिरीश ! अजून होता तस्सेच आहात तुम्ही. अगदी पूर्वीसारखे !

**अपर्णा :** तस्साच ? तुला कल्पना नाही ! फार फार बिघडलाय हा ! खरं तर तुला घरात कसं ठेवायचं याच काळजीत पडलेय मी !

**गिरीश :** आणि हे काय अंजू ? सामान म्हणजे फक्त एक बॅग ?

**अंजू :** ही पिशवी आहे ना ? हिच्यात खूप राहतं.

**अपर्णा :** राहू दे. पण मला बाई भीतीच वाटते असल्या पिशव्यांची.

**अंजू :** भीती ? ती का म्हणून ?

**अपर्णा :** कोण घेऊन फिरतात माहितेय या असल्या पिशव्या ? त्या ‘ सोशल वर्क ’

करणाऱ्या मुली असतात ना, त्या. म्हणजे दलितांसाठी सभा घेणाऱ्या. फंड जमवणाऱ्या, संपाच्या घोषणा देणाऱ्या मुली! इथं ब्लू स्टोन अपार्टमेन्टमध्ये कोण ग वापरणार असली पिशवी?

(रेजी एका लहानशा ट्रेमध्ये चहाचं साहित्य घेऊन येतो.)

**अंजू :** थँक्यू. पण अय्या, याला कसं कळलं मला चहा हवाय तो?

**अपर्णा :** बाई ग, तो फॉरिन फर्मच्या एक्झिक्यूटिव्हचा बेअरा आहे. त्याला कित्येक गोष्टी न सांगताच कळाव्या लागतात.

(रेजी जातो.)

**गिरीश :** मेहुणीबाईंचा प्रवास कसा काय झाला? हिला भलतीच काळजी पडली होती—जशी काही तू आघाडीवरूनच यायची होतीस!

**अपर्णा :** मग? ट्रेनचा प्रवास म्हणजे लढाईच ती!

**अंजू :** एवढं काही नाही, अग! आरामात आले!

**अपर्णा :** म्हणजे? आता रेल्वे पण चांगल्या केल्यायत् वाटतं?

**अंजू :** किती वर्षांनी भेटताय् गिरीश! ताई तरी मध्ये एकदा येऊन गेली. पण तुम्ही बेळगाव सोडलंत ते सोडलंतच कायमचं!

**गिरीश :** पेपर्स कसे गेले एमेचे?

**अंजू :** गेले आपले असे-तसेच.

**अपर्णा :** म्हणजे जेमतेम फर्स्टक्लास मिळेल, एवढंच ना? (तिघेही हसतात.)

**गिरीश :** प्रोफेसर बरे आहेत ना? आणि आई?

**अंजू :** बाबा मजेत आहेत. सगळा पगार पुस्तकं विकत घेण्यात घालवतात नि आई जाम चिडते!

**अपर्णा :** फार पाहावंसं वाटतं ग बाबांना. पण काय करू? गेली तीन वर्षं यांच्याबरोबर सेल्स कॉन्फरन्सेसना जावं लागलं. काश्मीर, सिमला, उटी— असं कुठं कुठं. यंदा तर इंग्लंडला जायचं चाललंय.

**अंजू :** ताई, मी आलेच हं जरा हातपाय धुवून. न्हाणीघर कुठाय?

**अपर्णा :** न्हाणीघर? तुला काय ते आमचं बेळगावचं न्हाणीघर आठवलं? फुटक्या तपेलीनं हौदातनं पाणी काढायचं? (हसत) तिथं कसे नाही दाराला खिळे मारले होते गिरीशनं? त्याच्यावरून कपडे नेमके खाली पडायचे नि ओले व्हायचे—(हसता हसता तिच्या लक्षात येतं की गिरीश गंभीर झाला आहे. ती हसायची थांबते.) अग, डाव्या बाजूला आमची बेडरूम आहे. त्यातली माझी बाथरूम वापर. रेजी—

**अंजू :** तुझी बाथरूम? म्हणजे वेगळी आहे? (रेजी येतो.)

**अपर्णा :** अग इथं सगळ्या इंग्लिश पद्धती. हिज् बाथरूम आणि हर बाथरूम. रेजी

जरा दाखव तिला.
(अंजू रेजीवरोबर जाते.)
(गिरीशला) रागावलांत ?

**गिरीश :** बेळगावचं न्हाणीघर आठवलं.

**अपर्णा :** गंमतीनं म्हटलं मी. तुला दुखवावं म्हणून नाही काही. उलट मला केवढा अभिमान वाटतो ! तू कायम बेळगावच्या कॉलेजात शेक्सपिअर शिकवत न राहता या पदाला पोचलास.

**गिरीश :** कोण जाणे. माझी गेलेली वर्षं मला कुणी परत दिली, तर कदाचित अजून-देखील मी शेक्सपिअर शिकवणंच पसंत करीन ! तुझ्या बाबांसारखं !

**अपर्णा :** हे बघ... ! असं काही तरी अभद्र बोलतोस—मग मला काळजी वाटते ! डिरेक्टर व्हायचं तू मनावर घेशील की नाही असं वाटतं !
(क्षणभर शांतता.)

**गिरीश :** अपर्णा-! अंजूच्या लग्नाचं म्हणत होतीस ना ? मला एकदम एक मुलगा आठवला बघ.

**अपर्णा :** खरंच ? कोण आहे ?

**गिरीश :** नितीन देसाई ! आमच्याच इथं आहे ट्रेनीजमध्ये. चांगला ब्रिलियंट आहे. माझ्यासारखीच प्रमोशन्स मिळवील.

**अपर्णा :** ब्रिलियंट असायलाच हवा. फर्स्ट क्लास करिअरच्या मुलीला शोभायला नको का ? तुझ्यासारखाच आहे म्हणजे प्रॉब्लेम नाही– तिला बहिणीचा हेवा नको वाटायला.

**गिरीश :** मग ?

**अपर्णा :** आपण थोडीशी टॅक्ट लढवूया. तू त्याला कामाच्या निमित्तानं इथंच बोलावून घे. एकदा अंजूशी ओळख झाली की तो आपणहून येत जाईल. त्यांचं त्यांना जमवू दे. आपण उलट नंतर थोडा विरोध-बिरोध करू म्हणजे तेवढंच त्यांना समाधान प्रेमविवाहाचं.

**गिरीश :** अपर्णा ! आत्ता माझ्या लक्षात येतंय. तू अशीच काही तरी टॅक्ट लढवून मला अडकवलंस; होय ना ?

**अपर्णा :** हो ! जसा काही तू फार भोळाच होतास की नाही ? एका माणसाला एवढी घाई झाली होती की मला एमे काही पुरं करू दिलं नाही.

**गिरीश :** (हसून) मग – ऑपरेशन नितीन देसाई ?

**अपर्णा :** आजच्या आज घे बोलावून पंधरा दिवस म्हणजे अगदी थोडा वेळ आहे.

**गिरीश :** अग पण आज ऑफिस बंद आहे. उद्या बघू.

अपर्णा : ते काही नाही. आता जाताना वॉचमनबरोबर त्याच्या घरी निरोप पाठवं.
(अचानक अंजली येते.)

अंजू : काय ग, तुम्ही दोघं मिळून माझ्याविरुद्ध काही कारस्थानं तर करीत नाही ना ?

गिरीश : आता तुम्ही दोघी बसा एकमेकींच्या डोक्याला डोकी घासत. मला मात्र निघायलाच हवं. (आत जातो.)

अंजू : आता कुठं चालले ग हे भर दुपारी ?

अपर्णा : रेसकोर्सवर.

अंजू : म्हणजे ? गिरीश रेस खेळतात ? आणि तू हे चालू देतेस ?

अपर्णा : चालू देते म्हणजे ? अग त्यांच्या कामाचाच भाग आहे तो. तिथं सगळे डायरेक्टर्स भेटतात. त्यांच्या नजरेत राहता येतं.

अंजू : अग पण रेस म्हणजे व्यसन म्हणतात ना ? अन् कुणी कुणी तर रेसच्या नादानं भिकेला लागतात म्हणे !

अपर्णा : (हसते.) अग ते सगळं नाटका-कादंबऱ्यांत होतं. आपण लिमिटमध्ये राहिलं की झालं. गिरीश तर कधीच शंभरच्या वर लावत नाही!

अंजू : बघ बाई– मी नवीन नवीनच शिकतेय एकेक. मी तर ऐकलं होतं की रेस म्हणजे वाईट गोष्ट–
(कपडे बदलून, आणि बायनॉक्युलर घेऊन गिरीश बाहेर येतो.)

गिरीश : (रेस गाइड उचलून खिशात टाकीत) ओके. आय ॲम् ऑफ.

अपर्णा : हिला धक्का बसलाय तू रेसिसना जातोस म्हणून.

गिरीश : असे पुष्कळ धक्के बसायचेत तिला अजून.

अपर्णा : बेस्ट ऑफ लक, गिरीश.

गिरीश : थँक्यू डार्लिंग (जातो.)

अंजू : बेळगावच्या कॉलेजचे इंग्लिशचे प्राध्यापक– साहेबलोकांच्या गाठीभेटींसाठी रेसकोर्सवर! घोड्यांवर थोडेसेच म्हणजे शंभर रुपये लावतात! ताई, गिरीश इतका बदलेल असं वाटलं नव्हतं !

अपर्णा : (किंचित चिडून) नको वाटतं बदलायला ? बदलल्याशिवाय का माणूस मोठं होतं ? आपले बाबा अजून बेळगावातच बसलेत ना शेक्सपिअरला कवटाळून ? सहाशे रुपयांच्या वर कधी पगार गेला त्यांचा ? पुढं जायचं तर बदलायलाच हवं माणसानं !

अंजू : पूर्वीसारखे गाणं ऐकायला तरी जाता की नाही तुम्ही ?

अपर्णा : नाही ग ! एकसारखं ऑफिस एके ऑफिस. राहिलेल्या वेळात कॉकटेल्स, डिनर पार्टीज, रेसिस– भयंकर बिझी शेड्यूल असतं आमचं ! गाणं बिणं

पार सुटलंय!

अंजू : सांगतेस काय ?

अपर्णा : हाल आहेत अगदी! वर ही भाषणं-बिषणं करणारी मंडळी असतात ना, त्यांना आमच्याबद्दल मोठा तिटकारा!— आम्ही म्हणे भांडवलदार. शोषण करणारे. आता कुणाचं ग शोषण करायला गेलोय आम्ही? आपले आपल्यालाच तर शोषतोय— पण ते कुणाला दिसतंय?

अंजू : (टेबलावरचा फोटो पाहून) काय ग, तुझा सुनील कधी यायचाय परत?

अपर्णा : आता उन्हाळ्याची सुटी लागली की येईल!

अंजू : तुझी तरी कमाल आहे ताई! एकटा एक मुलगा— आणि त्याला एवढ्या लहान वयात, शाळेसाठी डेहराडूनला ठेवलंस? इथं काय कमी आहेत का शाळा ?

अपर्णा : शाळा खूप आहेत ग — पण इथलं एज्युकेशनचं स्टँडर्ड बघ ना तू? एक्झिक्यूटिव्हची पुढची पिढी तयार करणार का हे लोक?

अंजू : ते सगळं खरं— पण तुला राहवलं कसं ग मुलाला सोडून?

अपर्णा : तेवढा त्याग आपण करायला हवा अंजू, मुलांच्या भल्यासाठी.
(दारावरची बेल वाजते. अपर्णा दार उघडते. रंगास्वामी आत येतात.)

अपर्णा : हॅलो! अंजू, हे रंगास्वामी. भारत मॅकिकनचे पर्सोनल ऑफिसर. आणि स्वामी. मीट माय सिस्टर अंजली. एमेला बसलीय.

रंगा० : ग्लॅड टु मीट यू. स्ट्रॉंग नेपच्यून— एक्सेप्शनली इंटलेजंट. आय कॅन मेक आउट फ्रॉम द फेस!

अपर्णा : रंगास्वामींना किनई ज्योतिषाचा भारी नाद! सगळ्यांना भविष्य सांगत असतात. लोकांचा भलताच विश्वास आहे त्यांच्यावर!

रंगा० : मिस्टर पोतदार...

अपर्णा : आत्ताच बाहेर गेले.

रंगा० : आय नो— आय नो! मला समजायला हवं होतं. लिब्रा राशीला आज डे ऑफ डिसपॉइन्टमेन्ट आहे! आय शुडण्ट हॅव टेकन अ चान्स!

अपर्णा : (हसत) भविष्य सोडा— पण आज रविवार— म्हणजे दुपारी रेसीस असणार, एवढं तरी तुमच्या ध्यानात यायला हवं होतं!

रंगा० : रेसिस— रेसिसना गेलाय? थांबा हं— लेट मी सी— गिरीशची रास...

अपर्णा : व्हर्गो—

रंगा० : व्हर्गो? आणि आज रेसिसना गेलाय? ओ माय गॉड!

अपर्णा : का? काय झालं?

रंगा० : ही विल लूज— डेफिनिटली लूज. नो चान्स प्रॉफिट्स् फॉर व्हर्गो टुडे.

अपर्णा : एवढंच ना ? अहो, त्यांचं नशिबच नाही असल्या पैशाचं ! काय मिळवायचं ते स्वतःच्या मेहनतीवर !

रंगा० : बट ही मस्ट टेक केअर. सध्या थोडे दिवस वाईट आहेत व्हर्गोला. अब्राउट अ फोर्टनाइट. आमच्या लिब्राला...तर एकदम वाईट !

अपर्णा : मग तुम्ही काय करणार रंगास्वामी ?

रंगा० : आपला सगळा भरवसा लॉर्ड व्यंकटेशावर. कालपासून दररोज हजार जास्वंदीच्या फुलांचा संकल्प सोडलाय. करणार काय, त्याशिवाय लॉर्ड व्यंकटेश आपली केस घेणारच नाही ना हातामधे !

अपर्णा : हजार फुलं घेऊन तरी लॉर्ड व्यंकटेश काम करतो म्हणजे पुष्कळच आहे. अगदीच गव्हर्मेन्ट सर्व्हंट नाही ! ब्राइबही घ्यायची नि कामही टाळायचं.

रंगा० : नो नो, मिसेस पोतदार, लॉर्ड व्यंकटेशाचा महिमा तुम्हाला माहीत नाही. आज मी हा दिसतोय ना, ही सगळी लॉर्डची कृपा ! मॅड्रासमधून मी वयाच्या विसाव्या वर्षी निघालो, तेव्हा खिशात बारा रुपये होते. आणि माझं व्हायटल स्टॅटिस्टिक्स होतं, फॉर्टी फाइव्ह बाय वन ट्वेन्टी !

अंजू : अय्या ..म्हणजे मद्रासमध्ये बायकांच्यासारखी पुरुषांचीही मापं घेतात वाटतं !

रंगा० : ओ येस् ! मॅड्रासमधे बेकार पोरांचं जगण्याचं माप हेच ! त्यांचा टायपिंगचा, शॉर्टहॅन्डचा स्पीड ! माझा फॉर्टी फाइव्ह बाय् वन ट्वेन्टी होता ! पण मी इथं आलो, रोज व्यंकटेशाची पूजा सुरू केली आणि ॲप्लिकेशन्स लिहीत राहिलो. पहिला कॉल आला तो भारत मॅकिंकनमधेच. मिस्टर व्हिक्टर लॉर्डच होता तेव्हा मॅनेजिंग डायरेक्टर ! लगेच नोकरी मिळून गेली !—लॉर्डची मेहरबानी ! दुसरं काय ? बारा रुपये घेऊन आलो, परत जाईन मॅड्रासला तेव्हा अडीच लाख घेऊन जाईन !

अपर्णा : परत जाणार ? मला वाटलं इथंच सेटल झालात !

रंगा० : कसा होणार ? वाइफची तब्येत चांगली नसते. ब्लड प्रेशरचा त्रास आहे.

अपर्णा : रंगास्वामी, या माझ्या सिस्टरचा हात बघा हो जरा !

अंजू : तुझं काही तरीच ताई !

रंगा० : (तिच्याकडे निरखून पाहात) मुलगी एकदम सेन्सिटिव्ह आहे. माणुसकी आहे तिला.' असली माणसं फार नाही पाहायला मिळत आजकाल. (खिशातून जास्वंदीचं फूल काढून देतो.) घे. लॉर्ड व्यंकटेशाचा प्रसाद आहे.

(ती फूल घेते आणि डोक्यात माळते.)

अपर्णा : तिचा विवाहयोग बघा बरं जरा.

रंगा० : (अंजलीचा हात पाहून) एक्सलंट! बेस्ट नवरा मिळणार बघा हिला. बट नॉट धिस इअर! थोडं थांबावं लागेल. वाट बघावी लागेल.

अपर्णा : (हिरमुसली होऊन) या वर्षी नक्की नाही?

रंगा० : नक्की नाही. हवं तर दर सोमवारी लॉर्ड शिवाला दोन बेलाची पानं वाहू दे.

अपर्णा : हे हो काय स्वामी! आज सगळी वाईट भविष्यच सांगताय!

रंगा० : आपल्या हातात काय आहे, सगळा ग्रहांचा खेळ आहे! तुझ्या त्या नवऱ्याला मात्र सांभाळ! त्याचे दिवस खराब आहेत. त्याला म्हणावं एक कोराल घे.

अपर्णा : कोराल?

रंगा० : प्रवाळ म्हणतात ना, तो! तांबडा लाल प्रवाळ! चांगला मोठा खडा घ्यायला सांग. लवंगेला दिला ना मी!

अपर्णा : लवंगेला दिलात?

रंगा० : तर! त्यांची बायको येऊन घेऊन गेली. म्हणाली, लवंग्यांना प्रमोशन मिळायला पाहिजे!

अपर्णा : अस्सं! प्रमोशनसाठी प्रवाळ?

रंगा० : लाल प्रवाळ. मोठा खडा.

अपर्णा : गिरीशला हे कधीच पटायचं नाही स्वामी. तो काय प्रमोशन्स मिळवील ती स्वतःच्या हिंमतीवर! देवाधर्मानं किंवा मंत्रातंत्रानं नाही!

रंगा० : ते खरं मिसेस पोतदार! पण कधी कधी नशीब खराब असतं. कितीही प्रयत्न केला तरी परिस्थिती हातात राहात नाही. मग काय करायचं? (थांबून) जातो मी. नंतर येईन कधी तरी.

अपर्णा : काही काम होतं का?

रंगा० : नाही. सहज आलो होतो गप्पा मारायला. साला सन्डे आफ्टरनूनचं हे आपल्या लक्षातच राहिलं नाही. जातो. पण मिस्टर पोतदारला मात्र काळजी घ्यायला सांगा हां! म्हणावं, बी व्हेरी केअरफुल!

(जातो. अपर्णा त्याला दारापर्यंत सोडायला जाते. त्यांची पाठ वळताच फोनची घंटा वाजू लागते; अंजली फोन उचलते.)

अंजू : हलो- मिस्टर पोतदार्स रेसिडेन्स- नो, ही इज नॉट ॲट होम— जस्ट अ मिनिट! (अपर्णा परत येते, तिला फोन देत) भारत मॅकिकनच्या फॅक्टरीतून आलाय फोन.

अपर्णा : हे फॅक्टरीवाले स्वतः रविवारी काम करतात. म्हणून दुसऱ्यानं आराम केलेला पाहवत नाही त्यांना. (फोन घेऊन) हलो- मिसेस पोतदार

स्पीकिंग... हं... अगदी जरुरीचं काम आहे का ?... मी सांगेन त्यांना निरोप. हं सांगा... डिझेल इंजिन्सची कन्साइनमेन्ट जायची होती– कुठं ? फिलिपाइन्सला ? हां .. पंधरा तारखेला. तिचं काय झालं ? ती जाऊ शकणार नाही ? का ? फॉल्ट मिळालाय ?... मी सांगते त्यांना... हो आल्याबरोबर लगेच सांगते...लौकर नाही येणार. रेसकोर्सवर गेलेत. रेसकोर्सवर. बाय् ऑल मीन्स . वेलकम ! (फोन ठेवते.)

**अंजू :** काय झालं ताई ?

**अपर्णा :** (काळजीत पडलेली) काही तरी गडबड झालीय फॅक्टरीत. माल तयार होऊन पडलाय. फिलिपाइन्सला पाठवण्यासाठी. पण त्याच्या एका पार्टमध्ये काही तरी डिफेक्ट आहे म्हणतात... एक्सपोर्ट डिपार्टमेन्ट गिरीशकडे आहे– काळजी करण्यासारखी परिस्थिती आहे अंजू. समथिंग व्हेरी सीरिअस् !

**अंजू :** इतकी घाबरून जाऊ नकोस ताई–

**अपर्णा :** अंजू, रंगास्वामींचं भविष्य एवढ्या लौकर खरं ठरेलसं वाटलं नव्हतं ! ते म्हणालेत बी केअरफुल– बी व्हेरी केअरफुल !

(सावकाश काळोख होतो.)

**त्याच दिवशी : दुपारी.**

(रंगमंचाच्या अगदी दोन टोकांना, शक्य तो हॉलच्या सेटच्या बाहेर, एका बाजूला एक ऑफिस-टेबल व फिरती आरामशीर खुर्ची, आणि दुसऱ्या बाजूला श्रीमंती घरात शोभेल अशी सीट. दोन्हीकडे दोन फोन. ऑफिसमध्ये एक ठळक तारखेचं कॅलेंडर. रमाकांत लवंगे ऑफिसच्या फोनवर आपल्या बायकोशी बोलत आहे.)

**रमाकांत :** हलो नयना, मी रमाकांत बोलतोय. एकदम हॉट न्यूज. तू म्हणत होतीस ना, आज रविवारी काम करायला कशाला जातोस ? पण आलो, म्हणून ही न्यूज समजली.

**नयना :** कसली ते तर सांगशील ?

**रमाकांत :** अग, गिरीश पोतदारच्या डिपार्टमेंटमध्ये गोची झालीय.

**नयना :** अय्या, आता काय होणार त्याचं ?

**रमाकांत :** काय होणार ते उघडच आहे. प्रमोशन लांबणीवर पडणार.

**नयना :** खरंच ? त्याला तर म्हणे कंपनीचा ॲडिशनल डायरेक्टर व्हायचंय.

**रमाकांत :** ते विसर म्हणावं आता.

**नयना :** पण त्याला कळली का ही बातमी ?

**रमाकांत :** शोधताहेत त्याला इकडे तिकडे. पण हे राजेश्री असतील घोड्यांच्या मागे धावत.

**नयना :** हो– तो थोडाच तुझ्यासारखा रजेच्या दिवशी ऑफिसची ओझी वाहणारेय ?

**रमाकांत :** नयन– अग डिरेक्टर होणाऱ्यांनी रजेबिजेचा विचार करायचा नसतो.

**नयना :** आपण किनई, आज संध्याकाळी चक्कर टाकून येऊया पोतदारांकडे. काय म्हणतो बघू या गिरीश.

**रमाकांत :** तो म्हणेल, बातमी काढायला आले. दुसरं एखादं निमित्त शोधायला हवं.

**नयना :** त्यात काय ? काढ काही तरी काम. हां, विसरलेच असते. रंगास्वामींकडून आणलेली ती प्रवाळाची अंगठी– तिला काही उष्टं खरकटं लागू देऊ नकोस हं.

**रमाकांत :** अग इतकं कळत नाही का मला ?

**नयना :** राहू दे, कालपर्यंत तर तुझा विश्वासच नव्हता अंगठीवर. बघ लागला की नाही दिसायला तिचा गुण ?

**रमाकांत :** कबूल बाई, कबूल ! बस्स ?

**नयना :** मग– ठेवू फोन ?

**रमाकांत :** ठेव. बाय– (दोन्ही प्रकाशझोत एकदम विझतात आणि दिवाणखान्यातला प्रवेश चालू होतो.)

## प्रवेश दुसरा

**त्याच दिवशी : संध्याकाळी.**

(लॅच-कीनं दरवाजा उघडून गिरीश आत येतो. काहीसा अस्वस्थ. येऊन सोफ्यावर अंग टाकतो. कसलीच हालचाल दिसत नाही, म्हणून रेजीला हाका मारतो.)

**गिरीश :** रेजी... (सिगरेट पेटवतो आणि ओढू लागतो. एवढ्यात रेजी येतो.) सगळं घर सामसूम. गेली कुठं ही सगळी ?

**रेजी :** बाई आणि त्यांची सिस्टर बाहेर गेल्यायत. चार वाजता गेल्यायत. आता किती– साडेसहा वाजले ना, मग येतीलच आता. चहा आणू ?

**गिरीश :** नको मला. तू जा.

( रेजी जातो. गिरीश सिगरेटच्या धुराकडे पाहात स्वस्थ बसतो. हळू

हळू प्रकाशयोजना बदलते. एकाएकी पुरुषी आवाजातलं मंदहास्य ऐकू येतं. हळूहळू ते वाढत जातं. त्या हास्यानं सबंध दिवाणखाना भरून जातो.)

कोण हसतंय ते ? कोण हसतंय ? आय नो. मिस्टर विल्यम शेक्सपिअर. तुम्ही हसताय ? कशासाठी ? आम्ही आज रेसकोर्सवर दीडशे रुपये घालवून आलो म्हणून ? पण नाही, जुगाऱ्यांना तुम्ही कधीच हसणार नाही. तुमचे नायक दुसरं काय करीत आले ? किंग लिअर अख्ख्या राज्याचा जुगारच खेळला की ! आणि शिवाय त्यात हरला. मग तुम्ही कशासाठी हसताय सांगू ? अगदी बरोबर सांगू ? एकेकाळचा तुमचा भक्त– कवितांवर वेड्यासारखं प्रेम करणारा गिरीश पोतदार– आज डिझेल इंजिनच्या प्रॉब्लेमनं चक्रावून गेलाय, याचं हसू येतंय तुम्हांला. मग एवढं असेल तर तुम्हीच सांगा. सगळ्या मानवी व्यवहारांची कोडी उलगडण्यासाठी तुमची ख्याती. मग तुम्ही तरी सोडवा बरं हा प्रॉब्लेम. डिफेक्टिव्ह डिझेल इंजिन्स परदेशी पाठवायची कशी ? ( हसणं थांबतं. ) का ? आता का गप्प बसलात ? डिझेल इंजिन्सचा मानवी व्यवहाराशी संबंध नाही, असं म्हणायचंय की काय तुम्हाला ? (थांबून, हळुवारपणं) खरं सांगू मिस्टर शेक्सपिअर, तुम्हाला गप्प बसवायचं किंवा तुमचा अपमान करायचा, असा बिलकुल हेतू नव्हता माझा. तुम्हांला माहितेय, मी तुमच्यावर किती प्रेम केलं ! मीच कशाला, अपर्णानंही केलं. त्याशिवाय का तिनं हट्ट धरून पहिल्या पगारात आधी तुमच्या नाटकांची डिलक्स सीरीज विकत घ्यायला लावली ? तुम्हाला समजून घेण्यासाठी आम्ही रात्रंदिवस तुमच्या ग्रंथांमध्ये बुडून राहिलो. काय म्हणता ? आम्ही तुमचा नुसता अभ्यास केला ? तुम्हाला खरोखरीचं समजून घेतलं नाही ? मग परीक्षेत तुमच्या पेपरात मार्क बरे मिळाले ? अहो, मार्क मिळाले म्हणून तर ही नोकरी, त्यामुळंच डिझेल इंजिन्स आणि त्यामुळंच तुमच्याशी काडीमोड.—सोडला, तुमच्याशी संबंध साफ सोडला. आता संबंध काय तो गाडी, बायको, क्लब, कॉकटेल, रेसिस, डिनर, डान्स, पेरी मेसन, टाइम्स ऑफ इंडिया आणि फार फार तर टाइम मॅगझीन ! तुमची ती सीरीज डिलक्स आहे– कपाटात शोभून दिसते म्हणून ठेवून तरी दिली. नाही तर तीही गेली असती बाराच्या...नाही नाही, मिस्टर विल्यम, तुम्ही मला इतकं निष्ठुर नका समजू– मलाही काही माणुसकी आहे. माझीही श्रद्धा आहे– पण अहो, कितीही श्रद्धा असली तरी माणसाला बेळगावच्या कॉलेजात अडीचशे रुपयात ती टिकवता येत नाही. त्यात वडिलांचं

आजारपण, बायकोचं गर्भारपण, डॉक्टरांनी तिच्यासाठी दिलेली औषधांची नि व्हिटॅमिन्सची यादी ! माणूस हरतो— शिकवण्यावरचं प्रेम बाजूला ठेवतो आणि डिझेल इंजिनच्या कंपनीत अर्ज करतो. बस्स, मी ते केलं आणि तुमचे-माझे मार्ग वेगळे झाले— कारण इंजिन्स खपवणाऱ्या माणसाला आपलं सारं लक्ष त्यातच घालावं लागतं. तुम्हांला काय कळणार हे ? तुम्ही औद्योगिक क्रांती होण्याच्या आधीचे. तुम्ही आम्हांला समजू शकत नाही म्हणतो ते यासाठीच. जेन्युइन एक्झिक्यूटिव्ह असतो ना, त्याला हृदय नसतं. त्या जागी एक आय. बी. एम. कॉम्प्युटर असतो बसवलेला. आता कॉम्प्युटर म्हणजे काय हे नका बुवा विचारू. हां, एक एक्झिक्यूटिव्ह पाहिलाय मी, शशिभूषण मैत्र म्हणून. फार मानतो आपण त्याला. हा मैत्रसाहेब मात्र तुम्हांला कधीच काढू शकला नाही डोक्यातून. परिणाम काय झाला ? माणूस अर्ध्यावरनं नोकरी सोडून परत कॉलेजात शिकवायला गेला. कशामुळं ? ऐकायचंय ? अहो, तुमचा आठवा हेन्री आठवून. म्हणाला, महत्त्वाकांक्षा वगैरे गेली चुलीत. ' फ्लिंग अवे ॲंबिशन, बाय दॅट सिन फेल द एन्जल्स ! '

( अचानक प्रकाशयोजना बदलते. लॅच-कीनं दरवाजा उघडून अपर्णा आणि अंजली आत येतात. दोघींच्याही हातांत भरपूर पुडकी. )

( अपर्णाला उद्देशून ) या ...लेडी मॅक्बेथ, महत्त्वाकांक्षा झुगारून द्या. कारण तिच्यापायी देवमाणूसदेखील रसातळाला पोचतो.

**अपर्णा :** आज भल्या दुपारीच झालेली दिसतेय. किती पेग पाजली हॅरिसननं ?

**गिरीश :** फॉर युअर इन्फर्मेशन्स मॅदाम्, आय ॲम कम्प्लीटली सोबर. दारूच काय, पण चहासुद्धा प्यालो नाहीये मी गेल्या काही तासांत. पण शेक्सपिअर आठवायला काही प्यावं लागत नाही. खुद्द शेक्सपिअरनंच नशा चढते.

**अपर्णा :** गिरीश—तू गेल्यावर फोन आला होता फॅक्टरीतून.

**गिरीश :** गाठलं त्या लोकांनी मला टर्फ क्लबवर.

**अंजली :** कितपत गंभीर आहे प्रकरण ?

**गिरीश :** डोन्ट वरी. हे असं चालायचंच. (विषय बदलीत) तुम्ही गेला होता कुठं पण ?

**अपर्णा :** नेहमीचंच. थोडी इंपोर्टेड रेडिमेड गार्मेन्टस् बघितली. हेअर ड्रेसरकडे गेलो आणि मग मिसेस धिंग्रांच्या कॉफी पार्टीला.

**गिरीश :** कोण कोण होतं पार्टीला ?

**अपर्णा :** फक्त सिलेक्टेड एक्झिक्यूटिव्हच्या बायका. त्यासुद्धा खानदानी. मिसेस लवंगे वगैरे कोणी नाही. महाराष्ट्रियन तर आम्ही दोघीच होतो.

गिरीश : कोणाकोणाच्या चहाड्या केल्यात कॉफी-पार्टीमध्ये ?

अपर्णा : नो गॉसिप्स. स्ट्रिक्टली सोशल वर्क. अनाथ मुलांसाठी आम्ही एक फंड उभा करतोय. येत्या तेरा तारखेला रस्त्यात डबे फिरवणार आहोत. मिसेस धिंग्रांची मात्र कमाल आहे हं. एवढी मॅनेजिंग डायरेक्टरची बायको, पण अनाथ मुलांविषयी बोलताना डोळे पाण्यानं भरून आले त्यांचे.

अंजली : तशी मग इतरांनाही रुमालानं डोळे टिपणं भागच पडलं.
(बेल वाजते. रेजी दार उघडायला जातो.)

अपर्णा : चल अंजू, या वस्तू खोलीत टाकून येऊ. ( वस्तू गोळा करू लागतात. एवढ्यात नितीन देसाई येतो. उमदा, देखणा, बुद्धिमान तरुण.)

गिरीश : हलो नितीन– एकूण निरोप मिळाला तर तुला. बस बस. (ओळख करून देतो.) मिसेस पोतदार, आणि ही तिची बहीण अंजली. एमेला बसलीय.

नितीन : सब्जेक्ट कुठला ?

अंजू : एकनॉमिक्स.

गिरीश : अंजू—हा नितीन देसाई. आमच्याच इथं आहे. ट्रेनीजमधला मोस्ट ब्रिलियंट फेलो. अतिशय ब्राइट फ्यूचर आहे बघ याचं.

नितीन : (किंचित लाजून) आपल्याला– मार्केटिंग रिसर्चबद्दल काही तरी बोलायचं होतं असा निरोप...

गिरीश : लक्षात आहे माझ्या. पण खरं सांगू नितीन– आज सगळा मूडच खराब झालाय बघ. दुपारी ऊन लागलं आणि डोकं जाम दुखायला—

नितीन : मग मी उद्या भेटू का ? ऑफिसात ?

गिरीश : थोडा बस आता, आलायस तर. अपर्णा विल लुक आफ्टर यू. मी जरा पडतो जाऊन हं. (जातो.)

अपर्णा : तुम्ही काय घ्याल ? सरबत घेणार का ? बिअर घेणार असलात तर आहे– चांगली चिल्ड आहे–

नितीन : नको– सरबतच घेईन. पण तुम्ही कशाला उगाच त्रास घेता ?

अपर्णा : त्रास कसला ? माय प्लेझर. आलेच हं. (वस्तू घेऊन जाते.)

अंजू : तुम्ही आरामात बसा ना. रिलॅक्स.

नितीन : अं–हो...(थांबून) कसं वाटलं शहर ?

अंजू : आजच तर आले. पण खरं सांगू ? मला नाही वाटत मला इथं आवडेलसं.

नितीन : कां ?

अंजू : कोण जाणे. दुपारी शॉपिंगला गेले होते. तिथल्या झगझगीतपणाला कंटाळले मी. नुसती दुकानापासनं गाडीपर्यंत जाताना कोण मुश्कील !

नितीन : का ?

अंजू : भिकाऱ्यांची लहान लहान मुलं चहा-पावासाठी पै पैसा मागायची. अगदी अंगाला हात लावून. आमच्या हातातल्या वस्तूंकडे ती असं पाहायची की वाटायचं आपण त्यांनाच लुबाडून हे नेतोय.

नितीन : अहो ही पोरं पण भीक मागायला शिकवून तयार केलेली असतात. त्यांची एवढी दया वाटायला नको.

अंजू : का नको वाटायला ? या वयात त्यांना हे असलं शिक्षण मिळावं, याचं दुःख आहेच की.

नितीन : विचार केला की आपल्याला असंच वाटतं; आणि त्यामुळं विचारच करायची भीती वाटते.

अंजू : गाडीतून येताना हेच दिसत होतं. सगळीकडे. उंच उंच स्कायस्क्रेपर्स— आणि रस्त्यापर्यंत आलेल्या झोपडपट्ट्या. नागडी उघडी माणसं, आणि अंडरवेअरसुद्धा इंपोर्टेड लागणारी आमच्यासारखी लोकं. पाहिलं आणि गरगरल्यासारखं झालं.

नितीन : व्हायला नको खरं म्हणजे. तुम्ही अर्थशास्त्र शिकता ना ?

अंजू : हो. पण हे असं का, याचं स्पष्टीकरण आमच्या कुठल्याच पुस्तकात दिलेलं नाही. बेळगावला कधी मला हे जाणवलंसुद्धा नव्हतं. पण इथं येऊन पाहिलं तर...भयंकर आहे हे ! काहीजण दिवसेंदिवस श्रीमंत होताहेत आणि काही दिवसेंदिवस झिजत चाललेत. या शहराला एकाच वेळी परस्पर विरुद्ध रोग झालेत. हाय ब्लडप्रेशर आणि लो ब्लडप्रेशर. लठ्ठपणा आणि क्षय...

नितीन : फार थोड्यांना हे जाणवतं. आणि जाणवतं त्यांतलेही बहुतेक जण तिकडे दुर्लक्ष करतात.

अंजली : का ? का दुर्लक्ष करतात ?

नितीन : कारण आपण नेहमी एकटे एकटेच जगत असतो. सगळ्यांसाठी नाही. सगळ्यांबरोबरही नाही.

अंजू : पूर्वी गिरीश अगदी असंच बोलायचे. तेरा वर्षांपूर्वी. तेव्हा मी खूप लहान होते पण...

(अपर्णा सरबत घेऊन सावकाश येते.)

अपर्णा : (ग्लास त्याच्या हातात देत) सॉरी हं, खूप वेळ लागला सरबताला. मी जरा जेवणाच्या इन्स्ट्रक्शन्स देत होते रेजीला.

(दारावरची बेल वाजते. अपर्णा दार उघडायला जाते. क्षणभरानं गोपीनाथ आत येतो. देखणा, तरतरीत, सावळा तरुण. मात्र नितीनसारखा मृदू नाही. काहीसा आक्रमक. अंगात कपडेही त्याच्यापेक्षा पुष्कळच

वेगळे. खरखरीत सुती कापडाचा झब्बा–लेंगा. खांद्याला पिशवी अडकवलेली.)

अपर्णा : ( किंचित भीतीनं, किंचित नाराजीनं ) कोण पाहिजे तुम्हाला ?

अंजू : ( त्याला पाहताच आनंदाश्चर्यानं ) गोपीनाथ– गोपी... ( धावतच त्याच्याकडे जाते. )

गोपीनाथ : अंजू, किती दिवसांनी भेटतेयस ?

अपर्णा : ( किंचित ताठरपणे ) तुम्ही ओळखता एकमेकांना ?

अंजू : अग हा गोपीनाथ. कॉलेजात माझ्यापुढं होता दोन वर्षं. भलताच हुषार आहे !

अपर्णा : आता काय करतात हे ?

गोपीनाथ : बी. ए.नंतर लगेच नोकरी धरली. भारत मॅकिकनमध्येच.

अपर्णा : भारत मॅकिकनमध्ये आहात तुम्ही ? खरं नाही वाटत.

गिरीश : ( एकदम बाहेर येऊन ) कोण ? गोपीनाथच ना आलाय ? तरी वाटलंच आवाजावरून.

अपर्णा : म्हणजे खरंच हे तुमच्या इथं आहेत ?

गोपीनाथ : माझ्या या कपड्यांमुळं वहिनींचा गैरसमज झाला.

गिरीश : अग तो वर्कर्स युनियनचं काम करतो. आणखीसुद्धा पुष्कळ चळवळी करतो. भलताच धडपड्या आहे.

अपर्णा : युनियनचं काम करतात ? म्हणजे प्रमोशन्स घेणार नसतीलच ?

गिरीश : मी खूप सांगून पाहिलं त्याला. पण कामगारांसाठी काही तरी करण्याच्या कल्पनेनं झपाटून गेलाय तो.

अपर्णा : तरुणपणी खूपजणांना असंच वाटतं. पुढं संसाराच्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्या की मग—

गोपीनाथ : खरंय तुमचं, पण संसाराची जबाबदारी आताच पडलीय आमच्यावर. आणि हा संसार फक्त बायकोमुलांचा नाही– फार फार मोठा आहे.

अपर्णा : युनियनचा संसार म्हणत असाल तर त्यातही कधी कधी निराशाच होते.

गोपीनाथ : कल्पना आहे मला. म्हणून फक्त युनियनचं काम एवढंच माझं काम समजत नाही मी. आपल्या गरीब भाईबंदांसाठी हातून होईल तेवढं करायचं ठरवलंय. युनियनमध्ये राहून ते होणार नसेल तर मी युनियन सोडीन.

गिरीश : आज इकडे कसा काय आलास पण तू ?

गोपीनाथ : दुपारी अचानक अंजू दिसली शॉपिंग करताना, यांच्याबरोबर. तेव्हा म्हटलं– इथंच उतरली असणार.

अंजू : (सरबताचा आपला ग्लास त्याला देत) घे. खूप बरं वाटलं भेटलास म्हणून. मला खूप कुतूहल आहे तुझ्या कामाविषयी. सगळं– सगळं सांगितलं पाहिजेस तू मला.

नितीन : मी निघतो.

अंजू : थांबा. चल रे गोपी. आम्ही दोघंही येतो तुम्हांला नाक्यापर्यंत सोडायला. ताई, मी आलेच हं नितीनला जरा चक्कर मारून येते गोपीनाथबरोबर. चार वर्षांनी भेटतोय, एकदा ऐकून घेते त्याच्या मोठ्या मोठ्या बाता. (गोपीनाथ हसतो.)

अपर्णा : फार वेळ लावू नकोस. काळोख पडलाच आहे.
(अंजली, गोपीनाथ आणि नितीन जातात.)

गिरीश : कसा काय वाटला नितीन देसाई ?

अपर्णा : नितीन ना ? चांगलाच आहे. पण मला काळजी वाटतेय या गोपीनाथची. काय अडलं होतं त्याचं इथं येण्यावाचून ?

गिरीश : उगाच रागावतेस तू. गोपीनाथदेखील चांगला मुलगा आहे.

अपर्णा : मला नाही आवडत असली पिशव्या अडकवणारी मुलं. स्वतःचं आयुष्य वाऱ्यावर सोडायचं आणि दुसऱ्याचंही डोकं भडकवायचं. आता येऊ दे अंजू घरी, चांगली समज देणारेय मी तिला.

गिरीश : अग पण ती लहान आहे का आता समज द्यायला ? तिला स्वतःचा विचार करता येतो.

अपर्णा : आताचा विचार करता येत असेल, पण पुढचा विचार करायला तरी अजून लहानच आहे. काही तरी अविचार करून बसेल आणि—

गिरीश : असा अविचार करूनच तू माझ्याशी लग्न केलंस ना ?

अपर्णा : हसण्यावारी नेऊ नकोस, गिरीश. माझ्या अनुभवामुळंच मी अंजूची काळजी घेतेय. तुला आठवतंय ना गिरीश, तू कॉलेजात लेक्चरर होतास– तेव्हा पहिली वर्षं आपण किती हालांत काढली ? अगदी सुनीलच्या जन्मापर्यंतची. तेव्हा मला खरंच मनापासून वाटायचं, की आपण उगाच लग्न केलं. माझे हाल व्हायचे आणि माझ्यामुळं तुझे. त्या हालांच्या दिवसातच मी ठरवून टाकलं की जे आदर्श, जी तत्त्वं, जे प्रेम माणसाला दोन वेळचं अन्न देऊ शकत नाहीत ती सगळी खोटी असतात. या विचारानं मी बदलले, गिरीश. आता माझा आदर्श एकच– तुझी डिरेक्टरची जागा.
(दारावरची बेल वाजते. अपर्णा दार उघडायला जाते.)

अपर्णा : (दारातच) या, आहेत घरात.

(पन्नाशीच्या एका रुबाबदार गृहस्थाला घेऊन आत येते. हे मिस्टर बॅनर्जी. भारत मॅकिकनच्या सिनियर एक्झिक्युटिव्हजपैकी एक.) बसा.

गिरीश : (आश्चर्याने) मिस्टर बॅनर्जी ? आपण स्वतः ?

बॅनर्जी : ...हलो मिसेस पोतदार!

अपर्णा : हलो!

बॅनर्जी : हाउ आर यू ?

अपर्णा : फाइन. थॅंक यू. बसा हं, आलेच मी. (आत जाते.)

बॅनर्जी : मिस्टर पोतदार, तुम्हाला फॅक्टरीचा रिपोर्ट मिळाला आहे.

गिरीश : येस सर. सिलिंडर हेड्स क्रॅक झालीयत, आणि ती रिप्लेस केल्याशिवाय आपण माल पाठवू शकत नाही. होय ना ?

बॅनर्जी : हो; आणि सिलिंडर हेड्स रीकास्ट करायला कमीत कमी पंधरा दिवस लागणार आहेत. कितीही फास्ट काम केलं तरी.

गिरीश : बापरे!... कन्साइनमेन्ट पंधरा तारखेला जायचीय. आज तीन तारीख. म्हणजे फक्त बारा दिवस राहिले—

बॅनर्जी : म्हणूनच मी पर्सनली भेटायला आलो, मिस्टर पोतदार. यापुढचा प्रत्येक दिवस मोलाचा आहे.

गिरीश : पंधरा तारखेला मध्यरात्रीपर्यंत माल बोटीवर चढायला हवा. नाही तर— नाही तर पन्नास लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी लागेल फिलिपाइन्सला. तसा क्लॉजच आहे.

बॅनर्जी : (वैतागून) पण असली नुकसानभरपाईची अट मान्य केली कशी आपण ?

गिरीश : नुकसानभरपाईच्या अटीशिवाय आपल्या देशाकडून कोण माल घ्यायला तयार होईल, सांगा. आपल्या देशाविषयी एवढा विश्वास आहे कुणाला ?

बॅनर्जी : म्हणजे बघा, पन्नास लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी लागणार! दहा लाख रुपये गव्हर्नमेन्टची एक्सपोर्ट सबिसडी बुडणार. म्हणजे साठ लाख प्लस हा एक्स्ट्रॉ माल तयार करावा लागला त्याचे नव्वद लाख...म्हणजे दीड कोटीचा तोटा आणि परदेशात कंपनीची बेअब्रू...टेरिबल!...आय कान्ट इव्हन इमॅजिन!

गिरीश : आय ॲम टेरिब्ली सॉरी सर.

बॅनर्जी : यू नीड नॉट. तुमचा यात काहीच दोष नाहीये.

गिरीश : दोष पर्सनल नसला तरी शेवटी कंपनीवर ठपका येणार, म्हणजे आपण सगळेच दोषाचे धनी.

बॅनर्जी : नाउ... नाउ डोन्ट गेट एक्साइटेड. हे तुम्हाला सर्वांत आधी कळावं म्हणून मी धावत आलो. तुम्हांला दोष देण्यासाठी नाही.

(पन्नाशीच्या एका रुबाबदार गृहस्थाला घेऊन आत येते. हे मिस्टर बॅनर्जी. भारत मॅकिकनच्या सिनियर एक्झिक्युटिव्हजपैकी एक.) बसा.

**गिरीश :** (आश्चर्याने) मिस्टर बॅनर्जी ? आपण स्वतः ?

**बॅनर्जी :** ...हलो मिसेस पोतदार!

**अपर्णा :** हलो!

**बॅनर्जी :** हाउ आर यू ?

**अपर्णा :** फाइन. थँक यू. बसा हं, आलेच मी. (आत जाते.)

**बॅनर्जी :** मिस्टर पोतदार, तुम्हाला फॅक्टरीचा रिपोर्ट मिळाला आहे.

**गिरीश :** येस सर. सिलिंडर हेड्स क्रॅक झालीयत, आणि ती रिप्लेस केल्याशिवाय आपण माल पाठवू शकत नाही. होय ना ?

**बॅनर्जी :** हो; आणि सिलिंडर हेड्स रीकास्ट करायला कमीत कमी पंधरा दिवस लागणार आहेत. कितीही फास्ट काम केलं तरी.

**गिरीश :** बापरे!... कन्साइनमेन्ट पंधरा तारखेला जायचीय. आज तीन तारीख. म्हणजे फक्त बारा दिवस राहिले–

**बॅनर्जी :** म्हणूनच मी पर्सनली भेटायला आलो, मिस्टर पोतदार. यापुढचा प्रत्येक दिवस मोलाचा आहे.

**गिरीश :** पंधरा तारखेला मध्यरात्रीपर्यंत माल बोटीवर चढायला हवा. नाही तर– नाही तर पन्नास लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी लागेल फिलिपाइन्सला. तसा क्लॉजच आहे.

**बॅनर्जी :** (वैतागून) पण असली नुकसानभरपाईची अट मान्य केली कशी आपण ?

**गिरीश :** नुकसानभरपाईच्या अटीशिवाय आपल्या देशाकडून कोण माल घ्यायला तयार होईल, सांगा. आपल्या देशाविषयी एवढा विश्वास आहे कुणाला ?

**बॅनर्जी :** म्हणजे बघा, पन्नास लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी लागणार! दहा लाख रुपये गव्हर्नमेन्टची एक्सपोर्ट सब्सिडी बुडणार. म्हणजे साठ लाख प्लस हा एक्स्ट्रॉ माल तयार करावा लागला त्याचे नव्वद लाख...म्हणजे दीड कोटीचा तोटा आणि परदेशात कंपनीची बेअब्रू...टेरिबल!...आय कान्ट इव्हन इमॅजिन!

**गिरीश :** आय ॲम टेरिब्ली सॉरी सर.

**बॅनर्जी :** यू नीड नॉट. तुमचा यात काहीच दोष नाहीये.

**गिरीश :** दोष पर्सनल नसला तरी शेवटी कंपनीवर ठपका येणार, म्हणजे आपण सगळेच दोषाचे धनी.

**बॅनर्जी :** नाउ... नाउ डोन्ट गेट एक्साइटेड. हे तुम्हाला सर्वांत आधी कळावं म्हणून मी धावत आलो. तुम्हांला दोष देण्यासाठी नाही.

**गिरीश :** दॅटस् व्हेरी काइन्ड ऑफ यू, सर. बट ॲज द एक्सपोर्ट मॅनेजर, मलाच ही जबाबदारी घ्यायला हवी. दीड कोट रुपयांच्या धक्क्यापासून कंपनीला वाचवायला हवं.

**बॅनर्जी :** (आश्चर्यानं) तुम्ही ? तुम्ही कसे कंपनीला वाचवणार ?

**गिरीश :** का ? ते माझं कर्तव्य नाही का ?– निदान तसा प्रयत्न करणं तरी ?

**बॅनर्जी :** पण काहीही केलं तरी बारा दिवसांत नवीन हेडस् तयार होणं शक्यच नाही. पंधरा म्हणजेही कठीणच आहे... आणि कॉन्ट्रॅक्टच्या कंडिशन्स तर तुम्ही बदलू शकत नाही. दे आर प्रिंटेड देअर, इन ब्लॅक ॲन्ड व्हाइट. वेल, द सिच्युएशन इज एअरटाइट,– यू कान्ट डू एनिथिंग अबाउट इट.

**गिरीश :** सिच्युएशन इम्पॉसिबल असते तेव्हाच माणसाला खरं आव्हान असतं, बॅनर्जीसाहेब.

**बॅनर्जी :** वेल, यू मे टेक अप द चॅलेन्ज. नाही तर काय, आपला सगळ्यांचा कपाळमोक्ष ठेवलेलाच आहे !

**गिरीश :** डोन्ट वरी, सर, आय शॅल ट्राय टु सेव्ह द कंपनी.

**बॅनर्जी :** दॅटस् द स्पिरिट ! तुमच्याकडून हेच ऐकायला मिळावं अशी माझी अपेक्षा होती, मिस्टर पोतदार. या आपत्तीमधून तुम्ही कंपनीला वाचवलंत तर कंपनी तुम्हाला काय वाटेल ते द्यायला तयार होईल. खुद्द हॅरिसन-साहेबांच्या वतीनं मी हे प्रॉमिस देतो.

**गिरीश :** रिवॉर्डचं महत्त्व नाही, सर. महत्त्वाचं आहे ते कंपनीला वाचवणं.

**बॅनर्जी :** या क्षणी तरी ते जवळ जवळ अशक्य दिसतंय्. इम्पॉसिबल. ॲब्सोल्यूटली इम्पॉसिबल. बट यू मे ट्राय. बेस्ट ऑफ लक– (जातात. गिरीश त्यांना दारापर्यंत पोचवायलासुद्धा जात नाही. एका नशेत असल्यासारखा बसून राहतो.)

(एकदम पाठीमागून हसण्याचा आवाज येतो.)

**गिरीश :** (चमकून) कोण आहे ?

(पाठीमागे गोपीनाथ उभा. मात्र आता तो गिरीशच्या भासात आहे हे स्पष्ट व्हावे.)

**गोपीनाथ :** (हसत) वा सर, शब्द तर चिक्कार मोठेमोठे वापरलेत. आव्हान. कर्तव्य. जबाबदारी. बट डू यू रिअली मीन देम ?

**गिरीश :** काय म्हणायचंय तुला ?

**गोपीनाथ :** उघड आहे. कर्तव्याच्या आणि कंपनीला वाचवण्याच्या गोष्टी कशाला करता सर ? त्यापेक्षा असं का नाही सरळ सांगत की ही एकच संधी

आहे म्हणून ?

**गिरीश :** संधी ? कसली ?

**गोपीनाथ :** कर्तृत्व दाखवण्याची.

**गिरीश :** मग ? कर्तृत्व दाखवणं ही चूक आहे ?

**गोपीनाथ :** मुळीच नाही. पण हे कर्तृत्व कंपनीसाठी नाही. स्वतःसाठी आहे– एकट्यासाठी.

**गिरीश :** एकट्यासाठी ?

**गोपीनाथ :** होय सर. तुम्ही विचार करताय तो स्वतःचा– एकट्याचा. मी– मी, मी कसा डिरेक्टर होईन याचा. रिवॉर्डचं महत्त्व नाही म्हणालात मघा; पण तुम्हांला खरं महत्त्व रिवॉर्डचंच आहे. त्यासाठीच तुम्ही सारं करणार आहांत. कंपनीचा डिरेक्टर होण्यासाठी. वर्षाला सव्वा लाख रुपये मिळवण्यासाठी.

**गिरीश :** मग काय झालं ? माणसाला महत्त्वाकांक्षा हवीच. नाही तर त्याच्या जगण्याला अर्थच काय ?

**गोपीनाथ :** तुम्ही शेक्सपिअर साफ विसरून गेलाय सर. त्यानं काय सांगितलंय ? महत्त्वाकांक्षा झुगारून द्या, नाही तर...

**गिरीश :** ( चिडून ) शेक्सपिअरला काही कळत नव्हतं. निदान आजच्या काळातलं तरी. आज माणूस पुढं जातो तो महत्त्वाकांक्षेनं;– दुसरा तिसरा विचार न करता. आणि काय रे, मी का असू नये महत्त्वाकांक्षी ? महत्त्वाकांक्षेत वाईट काय आहे ? अं, बोल ना– महत्त्वाकांक्षेत वाईट काय ?

**गोपीनाथ :** याचं उत्तर तुम्हांला आताच मिळणार नाही, सर; नंतर मिळेल. पण मिळेल तेव्हा फार उशीर झालेला असेल...

**गिरीश :** फार उशीर ? म्हणजे काय, गोपीनाथ ? गोपीनाथ...
( पण गोपीनाथ नाहीसा झालेला. सरबताचे पेले घेऊन अपर्णा येते. )

**अपर्णा :** हे काय ? बॅनर्जी गेले ? आणि हाका कुणाला मारीत होतास ? सांग ना– तू असा घाबरल्यासारखा का दिसतोस ? गिरीश...

**गिरीश :** ( सावरून ) नाही अपर्णा. मी घाबरलो नाहीये. मला घाबरून चालायचं नाही. कंपनीवर दीड कोटी रुपयांचं संकट कोसळलंय, आणि त्यातून कंपनीला निभावून नेण्याची जबाबदारी माझ्यावर आहे...

– पडदा –

१०२१२८ ८।५।८३
नाटक

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

बुधवार ६ मार्च.

(संध्याकाळ उलटू लागलेली. साधारण साडेसातचा सुमार.
अपर्णा गिरीशची वाट बघत बसलीय. अंजली बसल्या–बसल्या पत्र लिहितेय.)

**अपर्णा :** साडेसात वाजत आले, अजून याचा पत्ता नाही.

**अंजू :** येतील. कालसुद्धा नाही का, ऑफिसातनं यायला किती उशीर झाला होता!

**अपर्णा :** कालचं ठीक आहे. पण आज खुद्द हॅरिसनकडे कॉकटेलला जायचंय. फार उशीर करून चालायचं नाही. याच्या लक्षात तरी आहे की नाही कोण जाणे!

**अंजू :** तू फोन केला होतास ना मघाशी?

**अपर्णा :** केला तर...! पण ऑपरेटर द्यायलाच तयार नाही. म्हणते साहेबांच्या केबिनवर लाल दिवा आहे. म्हणजे डू नॉट डिस्टर्ब साईन. अशा वेळी आम्हाला इन्स्ट्रक्शन्स असतात की फोन देऊन डिस्टर्ब करायचं नाही.

**अंजू :** पण तू सांगितलं नाहीस का– की मी बायको आहे त्यांची, म्हणून?

**अपर्णा :** सांगितलं तर. तशी सटवी हसून म्हणते – बायको म्हणजे तर अधिकच मोठा डिस्टर्बन्स! (अंजली हसते.) आणि म्हणे, परवांपासून लाल दिवा कायमच आहे केबिनवर! एवढ्या कसल्या कामात गुंतला असेल ग हा?

**अंजू :** विचार त्यांनाच आल्यावर.

**अपर्णा :** तो बसलाय सांगायला! ऑफिसमधलं जे ते बायकोला सांगायला तू काय त्याला लवंगे समजलीस?

**अंजू :** (पत्र पुरं करून) बेळगावला पत्र लिहितेय आईला. वाचायचंय?

अपर्णा : नको बाई. तुझं काही प्रायव्हेट असलं म्हणजे ?

अंजू : प्रायव्हेट काय असणार ? इथलाच रिपोर्ट कळवलाय !

अपर्णा : बाई ! म्हणजे ते रेसिसचं, नि ड्रिंक्स घेण्याचं वगैरे सगळं कळवलंयस ?

अंजू : नाही ग ! ते कसं कळवीन ? तू काय मला खुळी समजलीस ? मी एवढंच लिहिलंय, की ही माणसं भयंकर– म्हणजे अगदी आपल्याला कल्पनासुद्धा करता येणार नाही, इतकी श्रीमंत झालीयत, आणि आणखी श्रीमंत होण्यासाठी गिरीश रात्रंदिवस खपतोय !

अपर्णा : खपतोय म्हणजे ? आजचंच बघ की; दिवेलागणी झाली तरी याचा पत्ता नाही. (खिडकीबाहेर पाहात) लवंगेज निघाले बरं का पार्टीला ! आणि आज पारेखनं स्वतःची गाडी काढली नाही वाटतं ? लवंगेच लिफ्ट देतोय ! तुला माहीत नाही अंजली, हल्ली लोक इतके कद्रू झालेत ! मोठमोठे ऑफिसर्स म्हणवतात, आणि पेट्रोलचा खर्चसुद्धा शेअर करतात ! (थांबून) अय्या, सुरींदरसिंगनं नवी इंपाला घेतली वाटतं ? रोज गाड्या बदलतो ! त्याचं काय बाई, मॅकफर्नसनं मॅनेजिंग डायरेक्टर केलाय् त्याला ! ऑन हिज ओन टर्मस् !

(लॅच-कीनं दरवाजा उघडून गिरीश आत येतो. विलक्षण थकलेला आणि चिंताक्रान्त. अर्थात त्याच्या नेहमीच्या पद्धतीनं तो थट्टामस्करीखाली चिंता झाकायचा प्रयत्न करणारच.)

अय्या... गिरीश ? तू आलास ?– मग आपली गाडी कशी नाही दिसली मला ?

गिरीश : तू नेहमीप्रमाणं इतरांच्या गाड्या पाहण्यात दंग असशील.

अपर्णा : उशीर करूनच्या करून वर विनोद करायचे ! आज हॅरिसनकडे कॉकटेलला जायचंय् ...लक्षात तरी आहे का ?

अंजू : थांबा हं, मी चहा सांगते रेजीला. (जाते.)

अपर्णा : किती उशीर होतो हल्ली तुला... ? पगार काय एकटा तूच घेतोस वाटतं ? इथं 'ब्लू स्टोन'मध्ये दहा अपार्टमेन्टस् आहेत भारत मॅकिकनची. सहा वाजतात न वाजतात तो एकेकाच्या गाड्या हजर ! आठ-आठ वाजवणारं कुळ एकच...!

गिरीश : अग ज्याची त्याची जबाबदारी वेगवेगळी असते !

अपर्णा : हो ना– त्या मेहताला गोल्फ खेळत बसायची जबाबदारी दिलीय्. लवंगेवर पार्ट्या उडवण्याची जबाबदारी टाकलीय्, डॉक्टर बाटलीवाला सकाळ-संध्याकाळ हेल्थ क्लबवर असतो. चटर्जीला पत्ते खेळायचे असतात ! भारत मॅकिकन चालवायची जबाबदारी दिलीय् एकट्या तुझ्या

डोक्यावर ! (अंजू येते.)

**गिरीश :** जबाबदारी कुणी द्यावी लागत नाही अपर्णा. घेणारे आपणहून घेतात. (ब्रीफ-केसमधून एक पुस्तक काढतो आणि वाचायला लागतो.)

**अपर्णा :** हे काय, निघायचंय् ना आपल्याला ? वाचत काय बसलास ?

**गिरीश :** (वाचनातून नजर न उचलताच) तुम्ही लागा तयारीला. तुमचं आटोपेपर्यंत मी बसतो वाचत.

**अपर्णा :** कसलं भूत बसलंय याच्या मानेवर कोण जाणे ! चल अंजू—

**अंजू :** आलेच मी. ( अपर्णा जाते. ) डिस्टर्ब करू ?

**गिरीश :** केलंस तर खरं !

**अंजू :** हे काय वाचताय एवढं ? अगदी आल्या आल्या त्यात डोकं खुपसून बसलात ? इतकी ओढ मागं फक्त शेक्सपिअरनं लावली होती तुम्हाला !

**गिरीश :** ( हसून ) नाही, हा शेक्सपिअर नाही. कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट आहे.

**अंजू :** कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट ? गेले दोन दिवस हाच वाचताय ऑफिसात ? ' डू नॉट डिस्टर्ब 'चा लाल दिवा लावून ?

**गिरीश :** ( आश्चर्यानं ) तुला काय माहीत ? ( थांबून ) वाचतोय. पण अजून सगळा अंधारच आहे. कुठं तरी मिणमिणता उजेड दिसतो न दिसतो— परत अंधार होतो.

**अंजू :** ( कळकळीनं ) एवढं काय झालंय, गिरीश ?

**गिरीश :** ते सांगता येण्यासारखं नाही. तुला नाही, अपर्णाला नाही. कुणालाच नाही. मला एकट्यालाच तोंड द्यायला हवं या संकटाला. ( थांबून ) तू जा तयारीला. नाही तर तुझी ताई भडकेल.

( अंजली जाते. गिरीश लगेच कॉन्ट्रॅक्ट ॲक्टमध्ये हरवून जातो. काही क्षणांनी हसण्याचा हलका आवाज येतो. हळूहळू वाढत वाढत तो खोलीत घुमू लागतो. )

हसा— मिस्टर विल्यम शेक्सपिअर— आमची फजिती पाहून हसा ! महत्त्वाकांक्षेसाठी आम्ही धडपडतो म्हणून हसा ! कारण पहिल्यापासून महत्त्वाकांक्षी माणसांना तुमची सहानुभूतीच नाही ! ते खलनायक ! आणि प्रेमासाठी धडपडणारे— ते मात्र तुमचे नायक—नायिका ! मग ते बावळटासारखे विष पिऊन का मरेनात ? तुम्ही त्यांच्या आरत्या गाणार ! पण दीड कोटीची आणि कंपनीच्या अब्रूची जबाबदारी ज्या माणसावर असते त्याची मनःस्थिती तुम्हाला कळणार नाही ! कळली असती तर तुम्ही कवी झाला नसता, उद्योगपती झाला असता ! ( हसणं थांबलेलं. ) काय म्हणता— जबाबदारी घ्यायला कुणी सांगितलंय ? कोण सांगणार ? साहेब

नाही की गिऱ्हाईक नाही! प्रायव्हेट सेक्टरमध्ये कुणी कुणाला काही सांगत असतं? जेम्स वॅटला कोण म्हणालं वाफेचं इंजिन शोधून काढ म्हणून? डनलॉपनं टायर तयार केलं नसतं तर कुणी त्याचं इन्क्रीमेन्ट स्टॉप केलं होतं? फिलिप्सला कुणी दिव्यांची ऑर्डर मिळवायला रिमाइंडर पाठवलं होतं? पण माणसं आपणहून पुढं होतात. गरज असताना, संकट आलं असताना, माणसं आव्हान स्वीकारतात; ते पार पाडून दाखवतात— आणि इतिहास तयार होतो! आज भारत मॅक्किकनच्या इतिहासाचं एक पान लिहिलं जातंय— त्या वेळी मदत करायची की हसून हेटाळणी करायची? (बेल वाजते. रेजी दार उघडायला जातो.) कोण आलंय रेजी? (मणी दलाल येतो. त्याच्या मागून येऊन रेजी तडक घरात जातो. मणी दलालचा अवतार एखाद्या हिप्पीसारखा. रंगीबेरंगी कपडे. रंगीत काचांचा प्रचंड चष्मा वगैरे. हा ॲडव्हर्टाइझमेन्ट डिपार्टमेन्टचा प्रमुख. सध्या थोडा नशेत.)

**मणी :** (ओरडून) मी आलोय. मणी दलाल— हाय ..

**गिरीश :** हाय! तू भलत्या वेळी आलायस मणी. मी कॉकटेलला चाललोय. हॅरिसनकडे. तुझी कॉकटेल आधीच झालेली दिसतेय.

**मणी :** स्वतःच्या पैशानं. आम्हाला कोण बोलावतंय फुकट दारू प्यायला? पण साला या दुनियेत असं आहे बघ गिरीश, फुकट दारू प्यायली की ते सोशल ड्रिंकिंग ठरतं— पैसे टाकून प्यायली की ते व्यसन!

**गिरीश :** (हसून) जाहिरात खात्याचा मॅनेजर तू! तुझ्या तोंडी कोण लागेल? तुमच्या तोंडात कायम स्मार्ट कॉपी लिहिलेली असते!

**मणी :** मी तुला जाब विचारायला आलोय. जाहिरातीचं बजेट एकदम अडीच लाखांनी कमी केलं तुमच्या डिपार्टमेन्टनं! का?

**गिरीश :** हे ऑफिसात नसतं विचारता आलं?

**मणी :** गेले दोन दिवस बघतोय गाठायला. दारावर लाल दिवा. बॅनर्जीकडे तेच. टेक्निकल मॅनेजरकडे तेच. साल्यांनो रेड लाइट एरिया करून टाकलाय तुम्ही ऑफिसचा!

**गिरीश :** हे बघ, ऑलरेडी टाइट बजेटमध्ये दहा लाखाची कपात करायची आहे! कुठं करू सांग. त्या प्रमाणात जाहिरातीवर पंचवीस टक्के कमी नाही होणार?

**मणी :** अरे पण आपली ॲड एजन्सीवाली मिस डिसूझा—तिला हार्ट फेल व्हायची वेळ आलीय ना अडीच लाख कमी म्हणजे?

**गिरीश :** तिला हार्टफेलची काळजी नाही. तिचं हृदय तात्पुरतं तुझ्याकडे गहाण

आहे ते माहितेय मला!

**मणी :** हृदय कुणाला हवंय ? पण आजकाल तिचं शरीरसुद्धा मिळेनासं झालंय तुमच्या या कपातीच्या धोरणामुळं!— आणि तुमची ती फिलिपाइन्सची कन्साइनमेन्ट! तिची ॲड कॉपी तयार आहे,- कधी ॲप्रुव्ह करतोस ?

**गिरीश :** बघूया रे नंतर!

**मणी :** नंतर ? अरे पंधरा तारखेला फक्त नऊ दिवस राहिलेत्.

**गिरीश :** (शांत राहण्याचा प्रयत्न करीत) मला माहीत आहे!

**मणी :** आठ दिवसांत मॉडेल्सचे फोटो, ले-आउट, डिस्ट्रिब्यूशन— हे सगळं होणार कधी ?

**गिरीश :** हे बघ मणी, आपल्या कंपनीत तुझ्या ॲडपेक्षा अधिक महत्त्वाचे प्रॉब्लेम्स आहेत!

**मणी :** ... काय प्लॅनिंग केलंय् मी! ज्या रात्री डॉक्समधून आपला माल बाहेर पडेल त्याच दिवशी सकाळी सर्व पेपर्संना सोलस पोझिशनला आपली जाहिरात!— काय म्हणतोस ?

**गिरीश :** मणी... मी सध्या या बाबतीत काहीही म्हणू शकत नाही. जाहिरात द्यायची की नाही हेसुद्धा.

**मणी :** अरे पण गेल्या आठवड्यात तुझीच तर घाई चालली होती!

**गिरीश :** असेल; पण आता बजेट प्रॉब्लेम तयार झालेत. प्लीज... प्लीज गिव्ह मी ब्रीदिंग टाइम!

**मणी :** मग निदान जाहिरातीत छापायला काही केसाळ पुरुषांचे उघडे फोटो घेऊन ठेवायला सांगू का मी मिस डिसूझाला ?— अगदी लेटेस्ट क्रेझ आहे बघ ही जाहिरातीतली! टू एक्स्प्लॉइट मेल सेक्स!

**गिरीश :** काय वाट्टेल ते कर. पण मी आपणहून सांगेपर्यंत ॲड रिलीज करू नकोस! आणि माझ्याकडे परत परत येऊन कटकटही करू नकोस!
(बेल वाजते.)
रेजी, कोण आलंय् बघ जरा!
(रेजी दार उघडायला जातो.)

**मणी :** नो मॉरल्स— ॲब्सोल्युटली नो मॉरल्स!
(नितीन येतो. रेजी आत जातो.)

**नितीन :** गुड इव्हिनिंग सर! (गिरीश काहीच बोलत नाही.)

**मणी :** परवा एक सांगा— आज एक सांगा. शब्द पाळायची गरज वाटत नाही तुम्हा लोकांना! मी विचारतो, झोपडपट्टीवाल्यांचं वागणं आणि आपलं एक्झिक्यूटिव्हज्चं वागणं यात तसा काय मोठासा फरक आहे ? ते खोटं

बोलतात, आपण खोटं बोलतो; ते दारू पितात, आपण दारू पितो...

**गिरीश :** ते हातभट्टीची पितात न् तू व्हाइट हॉर्स पितोस, एवढाच फरक! आणि ती व्हाइट हॉर्स तुला आज जास्त झालीय्. तू घोड्यावर नाहीस. घोडा तुझ्यावर आहे. तेव्हा–गुड नाइट.

**मणी :** अरे म्हणजे चक्क मला घालवूनच देतोयस तू. नंतर ये पाया पडायला! ॲड वेळेवर येते का बघ पेपरात!

**गिरीश :** गुड नाइट, वन्स अगेन.

**मणी :** गुड नाइट्, सी यू इन हेल्! (जाताना नितीनला) हाय! (जातो.)

**गिरीश :** वेल, नितीन देसाई– तू काय म्हणतोयस?

**नितीन :** ते– रविवारी मार्केट रिसर्चसाठी मला भेटायला बोलावलं होतं—

**गिरीश :** असं?

**नितीन :** तीन दिवस मी ऑफिसमध्ये भेटण्याचा प्रयत्न केला– पण आपल्या केबिन-वर लाल दिवा...

**गिरीश :** ओ, डॅम इट!

**नितीन :** आजही तुम्हाला वेळ नसेल तर मी येईन पुन्हा कधी तरी, तुम्ही बोलवाल तेव्हा.

**गिरीश :** (एकदम चिडून) डॅम धिस पोलाइटनेस! कंपनीत लागलो तेव्हा तुझ्या-सारखाच मीही पोलाइट होतो. आता झालोय की नाही चिडचिडा? सो डोन्ट थ्रो दॅट पोलाइटनेस इन माय फेस. काय उपयोग नुसत्या चांगुल-पणाचा? नोकरी करता करता तो कुठच्या कुठं जातो! माणूस साफ बदलतो. तुला काय वाटतं? महिन्याच्या महिन्याला आपल्याला पगार देतात, तो कामाचा? छट्! ती आपल्या माणूसपणाची किंमत असते. दर महिन्याला कणाकणानं आपण आपला माणूसपणा त्यांना विकतो. आणि शेवटी नुसतं यंत्र होतो.

**नितीन :** खरंय सर!

**गिरीश :** लगेच यस्सर! म्हणजे तुझंही यंत्र व्हायला लागलंय एकूण!

**नितीन :** तुम्ही कामात आहात सर. मी नंतर येतो. (जाऊ लागतो.)

**गिरीश :** (क्षणभर त्याला जाताना पाहात राहतो. मग) थांब. (तो सावकाश परत येतो.) तुझ्या जागी मी असतो तर असाच निघून गेलो असतो; पण बोलावल्यावर परत आलो नसतो. कधीच परत आलो नसतो. आणि कायमचा सुटलो असतो या सापळ्यामधून! तुला एक गंमत सांगतो. तू माझ्याकडे आलास ना, तसाच मी एकदा गेलो होतो गोऱ्या साहेबाकडे. मिस्टर विल्सन त्याचं नाव. त्यानं मला विचारलं, डिझेल इंजिन कशासाठी

करतात ? मी उत्तर दिलं– प्रगतीसाठी. त्यानं विचारलं, प्रगती कशाकरता ? कशाकरता ?

नितीन : माणसाच्या भल्याकरता.

गिरीश : हेच– हेच उत्तर मी तेव्हा दिलं. साहेब भलताच खूष झाला. (ओरडून) पण मी खूष होणार नाही. कारण ते उत्तर चूक आहे ! आपण यंत्रं करतो ती माणसाच्या भल्याकरता नाही. ती आपल्या फायद्याकरता. कंपनी चालते ती प्रॉफिटकरता. आपण काम करतो ते पैशाकरता. सो दॅटस द आन्सर ! आपण यंत्रं तयार करतो ती आपल्यासारख्या यंत्रांकरता. माणसाकरता नाही.

(अंजली येते. पार्टीला जायच्या तयारीत.)

अंजू : अय्या, तुम्ही कधी आलात ?

नितीन : झाला थोडा वेळ.

गिरीश : मी वाचत बसतोय थोडा वेळ शेजारच्या खोलीत. (नितीनला) मार्केट रिसर्चच्या आधी याचा विचार कर– माणूस राहायचं की यंत्र व्हायचं, याचा. थिंक– थिंक... बिफोर इट्स टू लेट ! (जातो.)

अंजू : किती एक्साइट झाले होते ! गेले दोन तीन दिवस चित्तच थाऱ्यावर नाहीये त्यांचं. काय झालंय समजत नाही. तुम्ही नका मनावर घेऊ.

नितीन : नाही घेणार. खरं तर ते माझ्यावर रागावलेलेच नव्हते. ते रागावले होते स्वतःवर. माझ्या जागी ते जसे काही स्वतःलाच पाहात होते.

अंजू : कधी कधी मनात येतं– गिरीश सुखी तरी असतील का ?

नितीन : काय म्हणालात ?

अंजू : का ? एकदम दचकलातसे ?

नितीन : नाही...पण तुमचा प्रश्नच इतका चमत्कारिक होता ! एवढ्या लहान वयात आमच्या एक्सपोर्ट सेक्शनचा मॅनेजर झालेला माणूस– तो सुखी नसायला काय झालं ?

अंजू : असेलही. पण माझ्या आपलं मनात आलं.

नितीन : काही तरी भलभलतं येतं तुमच्या मनात.

अंजू : (हसून) तुम्हांला काय झालं इतकं अस्वस्थ व्हायला ?

नितीन : छे,– मला काय होणार ? पण त्याचं काय आहे, अंजली– (दचकून गप्प होतो.)

अंजू : (हसत) थांबायला काय झालं ? बरोबर घेतलंत माझं नाव.

नितीन : (हायसं वाटून हसतो.) अंजली– म्हणजे तुम्ही– तू हे असं काही तरी विचारतेस ना, म्हणजे मुळातच माणूस सुखी कशामुळं होतो हे...त्यामुळं

काय होतं—

अंजू : काय होतं ?

नितीन : त्यामुळं एकदम... त्यामुळं एकदम पायाखालची सतरंजी कुणी ओढून घ्यावी— तसं होतं. माणूस दणकन आपटतो. काही काही प्रश्न विचारायचे नसतात. कारण आपण काही काही गोष्टी धरून चालत असतो. त्या एकदम खोट्या वाटायला लागतात— तुझ्या या असल्या प्रश्नांनी !

अंजू : काय धरून चालतो आपण ? माणूस ज्या अर्थी 'ब्लू स्टोन' अपार्टमेन्ट्सच्या दहाव्या मजल्यावर राहतो, आणि त्याला एक सुंदर बायको...

नितीन : —आणि एक सुंदर आणि हुशार मेहुणी आहे !

अंजू : —त्या अर्थी तो सुखी असलाच पाहिजे ?

(बेल वाजते. अंजली दार उघडायला जाते. त्याच वेळी अपर्णा बाहेर येते. गिरीशच्या खोलीच्या दाराशी जाऊन)

अपर्णा : गिरीश— आमचं आटपलं बरं का ? चलतोस ना ?

(रंगास्वामी येतात. त्यांना पाहून) .. बाई ! आज काही आम्ही जात नाही कॉकटेलला.

नितीन : मी निघतो.

अपर्णा : या हं असेच. अंजू — (अंजली त्याला दारापर्यंत पोचवायला जाते.)

(गिरीश बाहेर येतो. हातात कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट तसाच, - त्यात बोट अडकवलेलं.

गिरीश : गुड इव्हिनिंग स्वामी. केव्हा आलात ?

अपर्णा : नशीब माझं. आता बसा दोघं गप्पा मारीत म्हणजे पार्टीला जायलाच नको. मीच मूर्ख म्हणून तयार होऊन बसले.

रंगा० : रास फ्रॅन्सर असणार. तुमच्या राशीला आज डिले इन एव्हरीथिंग आहे !

अपर्णा : माझ्या राशीला कायमच डिले लागलाय एका एक्झिक्यूटिव्हच्या रूपानं ! (जाते.)

रंगा० : नाऊ वुई हॅव डिसप्लीज्ड हर !

गिरीश : ते असंच चालतं नेहमी. तुम्ही लक्ष देऊ नका तिकडे. बसा.

रंगा० : अहो हे खूप बरं. आमच्या वाईफला आहे ब्लडप्रेशरचा त्रास. इकडे आमच्या ऑफिसच्या कटकटी वाढल्या की तिकडे तिचं ब्लडप्रेशर वाढलंच समजा !

गिरीश : ऑफिसच्या कसल्या कटकटी ?

रंगा० : कसल्या नाहीत ते विचारा. अहो पर्सोनल आणि लेबर ज्याच्याकडे तो ठार मेला म्हणून समजा. त्यात हल्ली आमचा सेटर्न वक्री आहे.

गिरीश : आपल्या फॅक्टरीत एकूण वर्कर्स तरी किती आहेत ?

रंगा० : आहेत सातशेच. पण सात कोटी असल्यासारखं वाटतं. आणि या सातशे लोकांसाठी तीन युनिअन्स. तिघांची तोंडं तीन दिशांना. सदा भांडणं चालू. पण एकमत फक्त एकाच बाबतीत. मॅनेजमेन्टला सतावायचं, या. मॅनेजमेन्टला म्हणजे पर्सनली मलाच.

गिरीश : एवढे सतावतात तरी कुठल्या गोष्टीवरून ?

रंगा० : कुठल्याही ! अगदी पिण्याच्या पाण्यापासून ते बस सर्व्हिसपर्यंत.

गिरीश : खरं म्हणता ?

रंगा० : तर हो ! भयंकर स्फोटक परिस्थिती करून ठेवलीय या युनिअन्सनी. कधीही भडका उडेल ! काडी टाकायचा अवकाश ! मी तर एक फुल साइज फोटो ठेवलाय लॉर्ड व्यंकटेशाचा माझ्या टेबलासमोर ! रोज त्याची पूजा करून मगच कामाला सुरुवात करतो !

(पण ही शेवटची दोन वाक्यं गिरीशला ऐकूच येत नाहीत. तो आपल्याच तंद्रीत बुडालेला.)

(...दूरवरून हसण्याचा आवाज येतो. त्यातून खोल आवाजात येणारे, क्षणोक्षणी मोठ्यानं ऐकू येत जाणारे मॅक्बेथचे शब्द : जसे काही फक्त गिरीशलाच ऐकू येतात.)

(" नक्षत्रांनो, या मॅक्बेथच्या मनातल्या काळ्याकुट्ट आकांक्षा अशाच काळोखात राहू द्यात. जे हातांनी करायचं ते डोळ्यांनाही दिसता कामा नये. पण जे व्हायला हवं ते झालंच पाहिजे.... जे व्हायला हवं ते झालंच पाहिजे. ")

(आवाज वाढत जाऊन मग हळूहळू ओसरतो.)

गिरीश : (हातातल्या कॉन्ट्रॅक्ट ॲक्टची पानं भराभर चाळीत एका विशिष्ट पानाशी येत, वर न पाहता एखाद्या नशेतल्या माणसाप्रमाणे) पेन पेन्सिल काही आहे का ?

( अंजली इतका वेळ काहीही न बोलता त्याच्या हालचाली पाहात आहे. ती शांतपणे उठते, आणि पत्र लिहायला घेतलेलं पेन त्याच्या हातात देते. तो तिच्याकडे न पाहताच ते घेतो आणि कॉन्ट्रॅक्ट ॲक्टवर भराभर रेघा मारतो.)

रंगा० : असं काय झालं यांना एकाएकी ? मिस्टर पोतदार ! मिस्टर पोतदार !!

(पण गिरीश आपल्याच तंद्रीत.)

(दुःखानं मान हालवून ) बरोबर ! नेपच्युन वक्रीवर– मेन्टल डिस्टर्बन्स !

(सावकाश अंधार होतो.)

शनिवार : ९ मार्च : दुपार.

(रंगमंचाच्या दोन्ही बाजूंना प्रकाशझोत. रमाकांत लवंगे ऑफिसमधून घरी नयनाला फोन करीत आहे.)

**रमाकांत :** नयन, अग गिरीश पोतदारची हॉट न्यूज !

**नयना :** खरंच ? त्याचा तो माल जायचा होता त्याचं काही आहे ?

**रमाकांत :** छोड दो ! माल तर आता जात नाहीच, पण गिरीशच्या या नालायक-पणापायी मॅनेजमेन्ट इतकी वैतागलीय की आता त्याला--

**नयना :** काय केलं ?

**रमाकांत :** पर्सोनेल डिपार्टमेन्टला टाकलाय. लेबर प्रॉब्लेम्स वगैरे किचकट गोष्टी सोडवायला ! म्हणजे रंगास्वामीच्या वरती– पण तेच डिपार्टमेन्ट !

**नयना :** अय्या... म्हणजे एक्सपोर्ट डिपार्टमेन्ट काढून घेतलं त्याच्याकडून ?

**रमाकांत :** अजून तरी पुरतं काढून नाही घेतलं, पण... लेबर दिलं म्हणजे चक्क डिमोशनच !

**नयना :** बिच्चारा ! मला वाटतं आता एक्सपोर्ट डिपार्टमेन्ट तुझ्याकडेच येईल, नाही ? नाही तरी इतका ऑल राउंडर दुसरा आहेच कोण तुमच्याकडे ?

**रमाकांत :** तरी मला वाटतच होतं, की आज ना उद्या या गिरीशच्या हुषारीचं बेंड फुटणार म्हणून ! अग इंग्लिश घेऊन एमेला फर्स्ट क्लास मिळवणं वेगळं आणि कमर्शिअल फर्मच्या एक्झिक्यूटिव्हची जबाबदारी सांभाळणं वेगळं !

**नयना :** पण याला तर डिरेक्टर व्हायची घाई झाली होती ! आणि आता उलटं त्याच्याकडे असलेलं एक्सपोर्ट डिपार्टमेन्टसुद्धा काढून घेणारेत ! (हसते.)

**रमाकांत :** एक्सपोर्ट सोड, लेबर तरी कुठं जमणारेय त्याला ? मी तर ऐकलंय की वर्कर्स संपावर जाणारेयत ! एकदा संप सुरू झाला की यांचे हाल कुत्रा खाणार नाही ! एका बाजूनं मॅनेजमेन्ट नि दुसऱ्या बाजूनं वर्कर्स !!

**नयना :** खरं की काय ? म्हणजे नोकरीसुद्धा जायची एखाद वेळी !

**रमाकांत :** इथला नियमच आहे बघ नयन ! क्विक रन्स काढायला बघतात ना, तेच रन-आउट होण्याचा चान्स जास्त ! काय समजलीस ?

(दोन्हीकडचे प्रकाशझोत एकदम विझतात, आणि दिवाणखान्याचा प्रवेश सुरू होतो. )

## प्रवेश दुसरा

मंगळवार, १२ मार्च : रात्री ९॥ चा सुमार.

(चिंताक्रांत गिरीश, अपर्णा आणि रंगास्वामी.)

रंगा० : अख्ख्या फॅक्टरीची कुंडली तपासून घ्यायला हवीय. नाही तर एवढे संप झाले, पण दोन दिवसांत इतक्या वेगानं भडकलेला संप मी कधी पाहिला नव्हता.

अपर्णा : पण स्वामी... आधी सुरूच कसा झाला हा संप ?

रंगा० : साधी गोष्ट,—वर्कर्सना आणणाऱ्या – पोचवणाऱ्या बसेस परवाच्या दिवशी आल्याच नाहीत. वाट पाहून सगळे वर्कर्स आले कामावर. लेट मार्क्स झाले. वरी रखडत जायला लागलं. दुसऱ्या दिवशी एकच बस आली,—आणि तीही मध्ये फेल झाली. पुन्हा सगळ्यांना लेट मार्क्स. झालं,–लगेच युनिअन मध्ये पडली. म्हणे सगळ्यांचे दोन्ही लेट मार्क्स काढून घ्या. दुसऱ्या युनिअननं तर कमालच केली – म्हणे लेट मार्क्स् तर काढाच, पण दोन्ही दिवस वर्कर्स चालत गेले, आणि घरी उशीरा पोचले, त्यासाठी सगळ्या सातशेच्या सातशे वर्कर्सना प्रत्येकी दीड तास ओव्हर-टाईम द्या !

अपर्णा : थिस इज टू मच !

रंगा० : 'नाही' म्हटल्याबरोबर लगेच संप सुरू झाला ! बरं, मी युनियन लीडर्सना खूप समजून सांगितलं— पण ते ऐकायला तयार नाहीत. खरं तर पहिल्या-पासून त्यांचा रागच आहे या बसवाल्यांवर! मागं चार-दोन वेळा मारा-मारी, शिवीगाळी झालीच आहे !

गिरीश : असं ?

रंगा० : ...तर हो ! नाही तर या वेळी एवढा प्रेस्टीज इश्यू करायचं कारणच काय ? या निमित्तानं तिन्ही युनिअन्सना बस सर्व्हिसवाल्याला कायमचं घालवून द्यायचंय ! आणि स्वतः बस सर्व्हिस चालवायचीय ! म्हणजे मॅनेजमेन्टकडून पैसे आणि वर्कर्सवरती होल्ड !

गिरीश : ओ, आय सी... युनिअन्सना बाहेरची बस सर्व्हिस नकोच आहे ? मग कसले ते संप मिटू देतात ?

अपर्णा : बाई ! म्हणजे हा संप असाच चालू राहील ?

रंगा० : तर हो ! आणि माझ्याविषयीसुद्धा नसत्या कंड्या पिकवल्यायत् या स्ट्राइक-वाल्यांनी ! सांगायला लाज वाटते, पण हे म्हणतात की– मी बस सर्व्हिस-वाल्याकडून कमिशन घेतो ! घोषणा देतात, 'रंगास्वामी कौन है ? बस

सर्व्हिसका भडवा है।' (अपर्णाला) एक्स्क्यूज मी!

गिरीश : सिच्युएशन इज टेरिबल!

रंगा० : वर्स दॅन टेरिबल! कालपासून घोषणा देताना माझ्या 'रंगास्वामी नावातल्या 'आर'चा 'एन' केलाय त्यांनी! आता या वयात काय ही विटंबना? म्हणतात 'नंगास्वामीचं मुंडकं उडवा'!

गिरीश : भयंकर आहे! या परिस्थितीत रंगास्वामी, तुम्ही काहीही केलं तरी वुई विल ऑलवेज सपोर्ट यू. डोन्ट वरी. वन थिंग इज ॲबसोल्यूटली क्लिअर! कोणत्याही प्रकारचा नियमभंग कंपनीला कधीच सहन होणार नाही.

रंगा० : दॅटस द स्पिरिट! मला वाटलंच, की तुम्ही या लोकांच्या चाळ्यांना दाद देणार नाही! तसा मी पण घाबरत नाही! लॉर्ड व्यंकटेशावर सकाळ–संध्याकाळ दोन्ही वेळा अभिषेक करायची ऑर्डर दिलीय. चार्जशीट्स पण रेडी ठेवलेत. हे युनिअन लीडर्स इतके हरामी झालेयत की चार्जशीटला नेहमी 'शिटचार्ज' म्हणतात!

गिरीश : व्हॉट नॉन्सेन्स!

रंगा० : मी घाबरत नाही मिस्टर पोतदार! काल मी पोलीसकडेसुद्धा गेलो होतो कंप्लेन्ट द्यायला! 'नंगास्वामीचं मुंडकं उडवा' म्हणतात, म्हणजे झालं काय? खुनाचीच धमकी ही! पण पोलीस त्यांचेच भाईबंद. म्हणतात, तुम्हीच नंगास्वामी कशावरून? कोर्टात जाऊन ॲफिडेव्हिट करा आपण नंगास्वामी असल्याचं. मग कंप्लेन्ट घेऊ!

गिरीश : मी कळवतो पोलिसांना.

रंगा० : मला स्वतःची काळजी वाटत नाही हो,— पण बायकोचं हाय ब्लडप्रेशर ...असलं काही तिच्या कानांवर गेलं तर ती कोलॅप्सच होईल!

गिरीश : काही नाही. आपण एकदम स्ट्रिक्ट राहिलं पाहिजे! नो फूलिंग! बघतो कसे धमक्या देतात ते! आयल् नेव्हर टॉलरेट धिस नॉन्सेन्स! तुम्ही खुशाल चार्जशीट द्या संपाच्या लीडर्सना. गो अहेड. मी आहे तुमच्या पाठीशी!

रंगा० : थँक्यू. थँक्यू मिस्टर पोतदार. तुमचं बॅकिंग आहे हे कळल्यावर मला केवढा धीर आला! आता आपण दोघं मिळून ही फाइट देऊ शकू. तुमच्या जागी दुसरा एखादा पुळचट मॅनेजर असता तर सगळ्या मागण्या मान्य करून बसला असता!

गिरीश : नथिंग डुइंग. समजू दे त्यांना. हा ब्रिटिश कन्सर्न आहे, आणि ब्रिटिश नेहमीच शिस्तीला महत्त्व देतात. पहिल्यांदा प्रॉडक्शन पहिल्यासारखं

नीट सुरू होऊ दे– मग विचार करू म्हणावं तुमच्या मागण्यांचा...

**रंगा० :** यू आर राइट, सर! (जायला निघतो.) आय फील सो रिलीव्हड्!

**गिरीश :** आणि हे बघा... मिसेस रंगास्वामीचं ब्लडप्रेशर वाढलं तर त्यांना लगेच नर्सिंग होममध्ये ठेवा– डोन्ट हेझिटेट! कंपनी सगळा खर्च देईल. मी सँक्शन करीन,... डोन्ट वरी!

**रंगा० :** थँक्यू मिस्टर पोतदार, यू आर अ जेम ऑफ अ पर्सन. (भारावून निघून जातो.)

**अपर्णा :** संप करणाऱ्या लीडर्सना चार्जशीट द्यायला सांगितलंस. पण खरंच युनिअननं ओढून धरलं आणि संप अधिकच चिघळला तर...?

**गिरीश :** या भीतीनं माघार घ्यायची?

**अपर्णा :** मला माहितेय गिरीश... माघार घेणं तुझ्या स्वभावातच नाही! पण अजून ते फिलिपाइन्सच्या कन्साइनमेन्टचं प्रकरण मिटलेलं नाही! आज बारा तारीख! पंधरा तारखेपर्यंत जायला हवा ना माल?

**गिरीश :** पंधराला मध्यरात्रीपर्यंत. म्हणजे अजून तीन पूर्ण दिवस आहेत.

**अपर्णा :** पण त्या काळजीत ही काळजी आणखी कशाला?

**गिरीश :** मग काय करू? वर्कर्सच्या मागण्या लगेच मान्य करून टाकू? पहिल्याच फटक्याला गारद होऊन युनिअनच्या हातातलं कायमचं खेळणं होऊ?

**अपर्णा :** मला भीती वाटते रे फार! सगळं नीट चाललं होतं,–तू डिरेक्टर होशील अशी आशा वाटत होती, आणि आता पाहता पाहता ही काय रे संकटं आली? आजवर तुझ्या कामाविषयी सगळ्यांचं इतकं चांगलं मत होतं, आणि आता तुझा दोष नसताना त्याच्यावर पाणी पडणार म्हणून वाईट वाटतं!

(बेल वाजते. रेजी दार उघडायला जातो.)

**गिरीश :** चल,– उगाच वाईट वाटून घेऊ नको. अंजू आली असेल– तिच्यासमोर तरी आपण हसत खेळत राहायला हवं...! चार दिवसांनी जाणार ती! तिचा मूड कशाला स्पॉइल करा?

(अंजली आणि निरंजन येतात. रेजी घरात जातो.)

हलो, पिक्चरला गेला होता ना? कसं होतं पिक्चर?

**अंजू :** बरं होतं,– टाइम पास म्हणून!

**अपर्णा :** टाइम पास? अग आर्ट फिल्मची ना तिकिटं काढली होती?

**अंजू :** ती टाकली विकून, आणि एका धम्माल हिंदी पिक्चरला जाऊन बसलो!

**अपर्णा :** (धक्का बसून) हिंदी पिक्चरला...? कुणी पाहिलं नाही ना तुम्हांला?

**अंजू :** चिक्कार लोकांनी पाहिलं;– पण तुमच्या वर्तुळातल्या कुण्णी नाही! ते

कशाला बापडे फिरकतायत तिकडे ? ते सगळे फॉरिन फिल्म्सना जातात ! तेसुद्धा चॅरिटी शोज्‌ना !-धर्मादाय करायला ! (हसते.)

**अपर्णा :** अग पण निदान एखादा बंगाली नाहीतर कन्नड सिनेमा तरी बघायचास ! हिंदी फिल्म म्हणजे किती लो वाटतं ! एकदम मासेसचं होऊन जातं ना ते ?

**अंजू :** जाम धमाल आली ! गाणी...मारामाऱ्या...रोमान्स...हूं ! एकदम ब्रेन-मसाज झाला मस्तपैकी !

**गिरीश :** बस ना नितीन. आय ॲम टेरिबली सॉरी,—परवाच्या दिवशी मी उगाच रागावलो तुझ्यावर !

**नितीन :** त्याचं काही नाही मोठंसं. हल्ली तुम्हांला टेन्शन फार आहे !

**अपर्णा :** टेबल लावायला सांगू का ? नितीन, तुम्ही पण जॉइन व्हाल नं ?

**अंजू :** अग ताई, आम्ही खाऊनच आलो बाहेर. तुम्ही घ्या जेवून.

**अपर्णा :** छान ! इतका वेळ आम्ही तुमच्यासाठी थांबलो होतो ! आणि आता हे ..!

**अंजू :** अगदी पोट फुटेस्तंवर खाल्लंय आम्ही दोघांनीही.

**गिरीश :** एवढं खाल्लंत तरी काय ?

**अंजू :** सांगितलं तर ताईला चक्कर येईल. पण गेले नऊ दिवस पार्ट्यांना एवढे एवढेसे फॅशनेबल परदेशी पदार्थ खाऊन खाऊन कंटाळा आला होता मला– मी चौपाटीवर जाऊन चक्क भेळ खाल्ली भेळ...!

**अपर्णा :** तुला सुधारण्याचा नाद आता सोडून दिलाय मी. (जाते.)

**गिरीश :** आम्ही जेवून घेतो (जातो.)

**नितीन :** बरी आठवण झाली ! ...हे तुझं ट्रेनचं रिझर्व्हेशन. सोळाला रात्रीची गाडी आहे ! (रिझर्व्हेशन देतो.)

**अंजू :** थॅंक्यू ! तुला त्रास दिला रिझर्व्हेशनचा. पण ताईला सांगितलं असतं तर तिनं मला ट्रेनच्या सेकंड क्लासनं जाऊच दिलं नसतं, आणि सोळाला तर नाहीच नाही !

**नितीन :** पण सोळा म्हणजे...आणखी चारच दिवस ! ..जायलाच पाहिजे का सोळाला ?

**अंजू :** हो रे ! आमच्या ग्रूपनं किनई बेळगावला थोडीशी ॲक्टिव्हिटी सुरू केलीय. अनाथ मुली, अशिक्षित बायका वगैरेंसाठी. आम्ही त्यांना कामं मिळवून देतो. शिक्षणाचीही व्यवस्था करतो. त्या सेंटरचं चिक्कार काम असतं. कशीबशी दोन आठवड्यांची रजा काढून आलेय मी. ताईला हे सांगितलेलं नाही. तिला यातलं काही समजायचं नाही. उलट हेटाळणी मात्र करील.

नितीन : मग काय ? एकदा गेलीस की परत यायचा चान्सच नाही !

अंजू : एवढ्यात तरी नाही.

नितीन : (एकदम) मग जाऊच नको ना ! कधीच-कधीच जाऊ नको !

अंजू : हे काय नितीन वेड्यासारखं ?

नितीन : अंजली – मी तुला आवडतो का ?

अंजू : हूं.

नितीन : तू माझ्याशी लग्न करशील अंजली... ?(थांबून) आत्ता नाही, मी सेटल झाल्यावर... तुझीही निश्चित दिशा ठरल्यावर... ! सांग ना, करशील ?

अंजू : एकदम कशी सांगू ? विचार करून सांगेन.

नितीन : पण वेळ कुठं आहे विचार करायला ?

अंजू : उद्या सांगेन, फार फार तर परवा.

नितीन : मी जातो बरी. जाऊ ना ?

अंजू : जा. नाही तर उशीर होईल.

नितीन : (हिरमुसला) मला वाटलं – लग्नाचं विचारल्यावर तू किती एक्साइट होशील ! पण तितकं काही तुला वाटलेलं दिसत नाही !

अंजू : खरं सांगू ? मला कल्पना होती, तू हा प्रश्न विचारशील याची.

नितीन : खरंच ? कधीपासून ?

अंजू : आपल्या पहिल्या भेटीपासूनच. मला तर अशी दाट शंका येते की आपण प्रेमात पडावं म्हणूनच गिरीशनं आपली ओळख करून दिली !

नितीन : काही तरीच काय ?

अंजू : कमर्शियल एक्झिक्यूटिव्हजना प्रत्येकच गोष्ट प्लॅन करता येते. प्रेमसुद्धा.

नितीन : छॅ ! सगळा रोमान्स घालवून टाकलास तू आपल्या प्रेमातला ! (ती हसते.) हसतेस काय ?

अंजू : मी अगदी अनुरोमॅंटिक मुलगी आहे बाबा.

नितीन : मग उद्या – नक्की हं ! (तो हसत हसत जातो. त्याच्या मागून अंजली.)
(आतून अपर्णा येते. काहीशी अस्वस्थ. मग ड्रॉवरमधून सिगरेटचं पाकीट काढते. सिगरेट पेटवते. अंजली येते.)

अंजू : ताई... ! (अपर्णा दचकते.)

अपर्णा : ओरडायला काय झालं ? मला सिगरेट ओढताना पाहिलंयस तू कॉकटेल पार्टीच्या वेळी.

अंजू : ते पार्टीमध्ये !... पण असं घरी . एकटीच असताना... ! ताई, तुझं काही तरी बिनसलंय, हो ना ?

अपर्णा : माझं... ? माझं काय बिनसणार ? मजेत आहे मी !

अंजू : गिरीशची काळजी करतेयस ?

अपर्णा : वेडी कुठली ! मी कधी कशाची काळजी करते तरी का ? सुख मिळतंय, ते शक्य तेवढं अंगी लावून घ्यायचं—! एवढंच मला माहीत ! तुझा नितीन काय म्हणतो ?

अंजू : माझा ?

अपर्णा : बरं बाई, राह्यलं.

अंजू : (सरळपणं) ताई... नितीननं मला लग्नाचं विचारलंय.

अपर्णा : चला, हे तरी एक सरळ झालं ! (थांबून) तू काय सांगितलंस त्याला ?

अंजू : मी म्हटलं... विचार करून सांगेन.

अपर्णा : बरं केलंस. आपण त्याची सगळी माहिती काढू या नीट. गिरीशला सांगतेच मी त्याची फाइल बघायला.

अंजू : तू म्हणजे ताई .. जी ती गोष्ट अगदी ऑफिशिअल करून टाकतेस.

अपर्णा : अंजू .. ! त्या गोपीनाथच्या नादानं तू नितीनला नकार तर द्यायची नाहीस ना ?

अंजू : (हसते.) तुला काय वाटतं ? मी गोपीनाथशी लग्न करणार आहे ?

अपर्णा : नाही. तितका मूर्खपणा नाही करायचीस. पण निदान वाहावत जाशील.

अंजू : नाही ताई, ती धास्तीच सोड तू. मला गोपीनाथ आवडतो. कारण जगात स्वतःपलीकडचा विचार करू शकणारी जी मूठभर माणसं असतात ना, त्यांतला तो एक आहे. पण लग्न ? मला नाही वाटत तो कधी लग्न करीलसं. सध्या तरी त्याला स्वतःचा संसार नको आहे; आणि कधीकाळी त्यानं केलंच लग्न, तर त्या मुलीची योग्यता माझ्यापेक्षा फार मोठी असेल !

अपर्णा : कशावरून ?

अंजू : त्याच्यासारख्याशी संसार करायचा म्हणजे आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी सोडायची तयारी हवी !

अपर्णा : नशीब... ! हे तुझ्या लक्षात आलंय !

अंजू : तू तरी कमाल करतेस ताई. प्रत्येक माणसाचा विचार लग्नाच्याच हेतूनं करायला हवा की काय ? एखादं माणूस आवडतं. फार फार आवडतं. जे आपल्याला करावंसं वाटतं, पण जमत नाही, ते त्याला साधतं, म्हणून आवडतं. अशा माणसाची अंतरावरून पूजा करावी ताई. पण आपली गाठ त्याच्याशी बांधून त्याला आपल्या पायरीला आणू नये ! (जाते.)

( बेल वाजते. अपर्णा दार उघडते. दारात गोपीनाथ उभा. )

अपर्णा : (आश्चर्यानं) तुम्ही ? एवढ्या रात्रीचे ?

गोपीनाथ : हो. तसंच जरूरीचं काम होतं.

अपर्णा : कुणाकडे ?

गोपीनाथ : साहेबांकडेच.
(गिरीश येतो.)

अपर्णा : उद्या ऑफिसातच नाही का भेटता येणार ? आज त्यांची तब्येत—

गिरीश : अपर्णा, येऊ दे त्याला.

अपर्णा : गिरीश, बाहेर ही अशी परिस्थिती असताना युनिअनच्या माणसांनी तुला खाजगीत भेटावं—

गोपीनाथ : मी युनिअनचा माणूस म्हणून भेटायला आलो नाही. नुसता एक माणूस म्हणून आलोय !

अपर्णा : इथं बोलाल कदाचित माणूस म्हणून; पण बाहेर गेल्यानंतर सांगाल ते मात्र प्रतिनिधी म्हणून !

गिरीश : तू काही काळजी करू नकोस अपर्णा. अग गोपीनाथला मी चांगलं ओळखतो. तो कधी सवलतीचा गैरफायदा घ्यायचा नाही. तू जा. मला एकट्यालाच बोलू दे त्याच्याशी. अग तो युनिअनचा कार्यकर्ता असेल, पण त्याआधी आमच्या कॉलेजचा विद्यार्थी आहे.

अपर्णा : बोलणी गुरुशिष्यांच्या नात्यानं होतील असंच समजू ना मी ? (जाते.)

गिरीश : सॉरी गोपीनाथ, गैरसमज करून घेऊ नकोस.

गोपीनाथ : छे...वहिनींचं बरोबर आहे. त्या तुमची काळजी घेतात. त्यांना दोष देता येणार नाही. पण खरंच, आज मी इथं आलो तो केवळ माणुसकीच्या नात्यानं.

गिरीश : कशासाठी आलास तू ?

गोपीनाथ : तुम्हाला एक विनंती करायला.

गिरीश : कसली ?

गोपीनाथ : हा संप अधिक चिघळू देऊ नका सर. तो मिटविण्याचा प्रयत्न करा.

गिरीश : हे मला येऊन सांगणं याचा अर्थ काय होतो ठाऊकेय तुला ?

गोपीनाथ : हो– एक प्रकारे ही युनिअनबरोबर केलेली गद्दारी आहे.

गिरीश : मग ? नेत्यांच्या पाठीमागं कार्यकर्त्यानं येऊन असं सांगायचं यामुळं संप लुळा नाही का पडत ?

गोपीनाथ : युनिअनचे नेते त्यांचं सामर्थ्य दाखवण्यासाठी संप चालू ठेवतील. तुमची शक्ती दाखवण्यासाठी तुम्हीही ताणून धराल; पण मधल्यामधे गरीब बिचाऱ्या कामगारांचे हाल होतील– त्याचं काय ?

गिरीश : आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात, यासाठी कामगारांनी तेवढं सहन करायला हवं.

गोपीनाथ : कुठल्या मागण्या सर? कामगारांना बस सर्व्हिस हवीय. ती खाजगी असली किंवा युनिअनची असली तरी फरक काय पडणार? शेवटी ती चालायची तशीच चालणार.

गिरीश : हे मला सांगून काय फायदा? युनिअननं जर ओढून धरलं तर मॅनेजमेन्टला—

गोपीनाथ : मॅनेजमेन्ट म्हणून तुम्हाला हे सांगत नाही सर. तसं सांगणं तर युनिअनलाही पटायचं नाही. तुम्हाला सांगतोय ते केवळ तुमच्या माणुसकीवर विश्वास ठेवून.

गिरीश : माझ्या माणुसकीवर तू विश्वास ठेवतायस? तो काय म्हणून?

गोपीनाथ : सर... तुम्ही मला कधीच इंग्लिश शिकवलं नाहीत. तुम्ही कॉलेजातून गेल्यानंतर चांगला पाच वर्षांनी मी कॉलेजात आलो. तरीदेखील आम्ही खूप ऐकलंय सर तुमच्याविषयी. शेक्सपिअर शिकवताना तुम्ही धुंद होऊन जायचां. त्याच्या पात्रांच्या स्वभावाचे पदर उलगडून दाखवावेत तर तुम्हीच, असं इतक्या वर्षांनंतरही आम्ही ऐकत आलो. अशा माणसाला दुसऱ्याचं दुःख समजल्याशिवाय कसं राहील?

गिरीश : (दुसऱ्याचं दुःख समजलं तरी त्याचा विचार करणं नेहमीच परवडतं असं नाही. प्राध्यापकाची गोष्ट निराळी,) एक्झिक्यूटिव्हची निराळी.

गोपीनाथ : का निराळी? या दोघांत फरक फक्त महत्त्वाकांक्षेचाच ना?

गिरीश : (चिडून) महत्त्वाकांक्षा फक्त मलाच आहे असं नाही. तुमच्या युनिअनच्या नेत्यांनाही आहे. ते संप चालू ठेवताहेत तो स्वतःचं महत्त्व वाढवण्यासाठीच की नाही?

गोपीनाथ : खरं आहे सर; पण हे असंच चालू द्यायचं का? एकऱ्या–दुकऱ्याच्या महत्त्वाकांक्षेसाठी शेकडो दीनदुबळया लोकांनी भरडलं जायचं का?

गिरीश : तुझ्या प्रश्नाचं उत्तर सापडलेलं नाही. निदान अजून तरी नाही.

गोपीनाथ : मग आपण ते शोधायला हवं. मला माहितेय, माझं हे बोलणं तुम्हाला पटायचं नाही. आमच्या नेत्यांना तर समजायचंही नाही. कारण ते सगळे भारून गेले आहेत, स्वतःच्या विचारानं. स्वतःची शक्ती जोखण्याच्या या खेळात, या गरीब, अडाणी कामगारांच्या, – आणि त्यांच्या दीन-दुबळया बायकामुलांच्या मात्र चिंधड्या होणार आहेत!

गिरीश : गोपीनाथ, कामगारांविषयी इतका खोलात जाऊन विचार करायला लागलास, तर तू युनिअनमधूनही बाहेर फेकला जाशील.

गोपीनाथ : मला ठाऊकेय. पण तशी वेळ आली तर मी आनंदानं बाहेर पडेन. मला स्वतःला नावलौकिक नको की पैसा नको; तेव्हा युनिअनमध्ये राहिलो, न

राहिलो— मला ते सारखंच आहे. म्हणून तर तुमच्याकडे येऊन संप मिटवायला सांगताना मला कसली भीती वाटत नाही.

**गिरीश :** पाहीन. मी तुला कसलंच आश्वासन देत नाही.

**गोपीनाथ :** हीच वेळ आहे सर. संपाला एकदा हिंसक वळण लागलं की फॅक्टरी बंद करणं भाग पडेल. फॅक्टरी बंद पडली तर उपासमार, कर्जबाजारीपणा,– या संकटातून उठणं सगळ्याच कामगारांना शक्य नाही होणार.

**गिरीश :** मला तुझा हेवा वाटतो गोपीनाथ... तुझ्यासारखा विचार करायला मी मोकळा नाही.

**गोपीनाथ :** पण तरी तुम्ही विचार कराल.. माझा भरंवसा आहे सर तुमच्यावर.

**गिरीश :** तू जा गोपीनाथ.

**गोपीनाथ :** माझ्या बोलण्याचा तुम्हांला त्रास होतोय सर– म्हणजे ते तुम्हाला पटायला लागलंय.

**गिरीश :** वाटेल ते बोलू नकोस. तुझं बिनबुडाचं बोलणं मी इतका वेळ ऐकून घेतलं तेच चुकलं. नुसता गरिबांचा कळवळा दाखवला म्हणजे सगळे प्रश्न सुटत नाहीत. स्वतःला समजतोस कोण तू? देवदूत की प्रेषित?

**गोपीनाथ :** कुणीच नाही. फक्त एक साधा माणूस. आणि मी माणूस आहे म्हणूनच मला कामगारांची काळजी वाटते. मी जातो सर. माझा अजूनही भरंवसा आहे तुमच्यावर. काहीही करा पण संप चिघळू देऊ नका सर... फॅक्टरी बंद होऊ देऊ नका!...( जातो. )
( क्षणभर गिरीश डोकं धरून बसून राहतो. मग अपर्णा येते. )

**अपर्णा :** गेला वाटतं? नसता गेला तर घालवायलाच आले होते. उगाच डोक्याला त्रास. काय सांगत होता?

**गिरीश :** काही नाही. संप मिटवण्याचा प्रयत्न करा म्हणत होता.

**अपर्णा :** युनिअनवाल्यांचा हा नवीन डाव दिसतो. तुम्हाला काही धमकी वगैरे तर नाही ना दिली त्यानं?

**गिरीश :** धमकी? एका परीनं धमकीच म्हणायची! फॅक्टरी बंद झाली तर कामगारांची घरं बसतील. त्यांच्या बायका-मुलांचे तळतळाट मला घ्यावे लागतील. ते पाप माझ्या माथ्यावर...!

**अपर्णा :** उगाच काही तरी विचार करू नकोस. ( तो विचार असह्य झाल्याप्रमाणं डोकं दाबून धरतो. ) दुखतंय का डोकं?

**गिरीश :** डोक्याच्या आत– आत काही तरी होतंय.

**अपर्णा :** ( ती एकच दिवा ठेवून बाकीचे सगळे विझवते. मग, अत्यंत मृदुपणं ) चल– मी डोकं चेपून देते.

(तो काहीच बोलत नाही. मुकाट्यानं तिच्या मांडीवर डोकं ठेवतो. ती सावकाश ते चेपू लागते. काही क्षणांनी– )

फार फार विचार करतोस तू. म्हणून दुखतं तुझं डोकं. क्षणभर तरी सगळे – अगदी सगळे विचार काढून टाक पाहू डोक्यातून. कसली काळजी करू नकोस. सगळं ठीक होईल, फॅक्टरी व्यवस्थित चालायला लागेल.

**गिरीश :** फॅक्टरीचा नाही ग ... मी स्वतःचाच विचार करतोय...आपले आपण ज्या गतीनं बदलतो ना, ती कधी कधी सहन नाही होत.

**अपर्णा :** एकदा बदलायचं म्हटलं, की आपण बदललो, हा विचारसुद्धा सोडायला हवा...तर तो खरा बदल. माणसानं आपला धर्मच वेगळा करून घ्यायला हवा. तुला काय वाटतं ? पहिला पगार खर्च करून तुला शेक्सपिअर घ्यायला लावणारी अपर्णा आता बदलली ? छट. अपर्णा बदलली नाही. ती अपर्णा दुसरी होती...ही वेगळी. दोघींचा संबंधच काय ? (थांबून) कधी कधी गिरीश, मला वाटतं की तू प्रेम करीत होतास ते त्या अपर्णावर ...या अपर्णावर नाही. म्हणून तर मला तो इंग्लिशचा प्राध्यापक गिरीश नकोय. मला हवाय तो मॅनेजिंग डिरेक्टर गिरीश.

**गीरीश :** नाही अपर्णा...या क्षणापुरती तरी तू पूर्वीची हो. माझा थकवा दूर जावा म्हणून. बघ...तू व्हायलाच लागलीयस वेगळी. तुझे शब्द तसं सांगत नसले, तरी तुझे हात सांगताहेत...हळूहळू तुझे शब्दही पूर्वीचे... अपर्णा... तू नेहमी म्हणायचीस ती कविता म्हण ना... ती... कुसुमाग्रजांची...

**अपर्णा :** (हलक्या गोड आवाजात सावकाश म्हणू लागते.)

उषःकालचे प्रकाशमंडल येता प्राचीवर
निळे पाखरू त्यातून कुणी अवतरले सुंदर
स्वप्न निळे ते बसे अंगणी हिरव्या वेलीवरी
आकाशाचा आशीर्वादच आला माझ्या घरी

जिवाभोवती माझ्या पसरुन घडीभरी लाघव
हाय, नभी ते निघून गेले मखमाली मार्दव.

उदासवाणे नेत्र शोधती जे कोठेही नसे
गळे पाकळी पाकळि त्यातुन फूल जुळावे कसे ?

निळ्या अनंता मिळून गेला माझा पक्षी निळा
रखरखती भंवताली आता माध्यान्हीच्या झळा

(फोन वाजतो. दोघंही दचकून उठतात. काही क्षण फोन वाजतच राहतो. मग गिरीश जाऊन फोन उचलतो.)

**गिरीश :** हलो... गिरीश पोतदार हिअर... बॅड न्यूज?... कसली? फॅक्टरी?... काय म्हणता? ओ गॉड... टेरिबल... थँक्यू. आइल बी राइट देअर.

**अपर्णा :** (भीतीनं जवळ जवळ तिचे हातपाय कापू लागलेले.) काय झालं गिरीश? कसली बातमी आहे?

**गिरीश :** वाईट बातमी आहे अपर्णा. फॅक्टरी बंद पडली.

**अपर्णा :** म्हणजे?

**गिरीश :** म्हणजे फॅक्टरी पूर्णपणं बंद केल्याचं हॅरिसननी जाहीर केलंय, नाइलाजानं. आज थर्ड शिफ्ट चालूच झाली नाही.

**अपर्णा :** परमेश्वरा... (ती जागच्या जागी कोसळते.)

– पडदा –

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

बुधवार १३ मार्च : संध्याकाळ.

[ साधारण सातचा सुमार. गिरीश नुकताच ऑफिसातून परत आलाय. हातात चहाचा कप. अपर्णा जवळच उभी. ]

**अपर्णा :** ...तर बाई ऐकलं आणि माझ्या छातीत धस्स झालं. वाटलं, की मी तिथंच घेरी येऊन पडणार! मी पुन्हा पुन्हा विचारलं मिसेस संन्यालना, की हे खरं का?

**गिरीश :** मग?

**अपर्णा :** तर त्या म्हणाल्या, खरं म्हणजे काय, रूलच आहे तसा! चक्क छापलेलं आहे कंपनीच्या नियमांत, तरी माझा विश्वास बसेना– तेव्हा मिस्टर संन्यालांनी मला कंपनी ॲक्टच काढून दाखवला!

**गिरीश :** असं?

**अपर्णा :** हो ना... कुठला सेक्शन तेसुद्धा सांगितलं. सांगते हं– (आठवून) हं– तीनशे चौदा, बरोबर– तीनशे चौदाच.

**गिरीश :** काय म्हणतो तीनशे चौदा?

**अपर्णा :** त्या सेक्शनप्रमाणे, म्हणे, डिरेक्टरचा कोणीही नातेवाईक कंपनीच्या नोकरीत असून चालत नाही.

**गिरीश :** अगदी मेहुणीचा नवरासुद्धा?

**अपर्णा :** अं हं.

**गिरीश :** मग तुझं काय म्हणणं?

**अपर्णा :** म्हणणं काय असायचंय? अंजलीचं नि नितीनचं जुळलं, तर ते तुझ्या डिरेक्टर होण्याच्या आड नाही का येणार?

**गिरीश :** असं होय?

**अपर्णा :** लोक आधी दोष काढायला टपलेलेच असतात. त्यांना काय, तेवढंच

निमित्त मिळेल.

गिरीश : मग काय करायचं ?

अपर्णा : ही नोकरी सोडून नितीन दुसरी नोकरी पत्करायला तयार असला तर... नाही तर अंजलीला सांगायचं की त्याचा नाद सोड.

गिरीश : तुला काहीच वाटत नाही का ग असं बोलायला ? काल तूच तर त्यांच्या प्रेमाचे गोडवे गात होतीस.

अपर्णा : काल मला कंपनी ॲक्टमधला रूल माहीत नव्हता.

गिरीश : कमाल आहे तुझी ! त्या बिचाऱ्या पोरांनी एकमेकांच्यात जीव गुंतवलाय. ...आणि तू कंपनीचे रूल बघतेयस ?

अपर्णा : अर्थातच. गुंतलेला जीव सोडवता येतो. कंपनीचा रूल बदलता येत नाही.

गिरीश : आपल्या लग्नाच्या वेळी कुणी आपल्याला असं सांगितलं असतं... एकमेकांना विसरून जायला... तर तू ते ऐकलं असतंस ?

अपर्णा : नसतं ऐकलं. आपल्यामध्ये मी कुणालाच येऊ दिलं नसतं !

गिरीश : मग आता...

अपर्णा : आताही तेच. तुझ्या नि डिरेक्टरशिपच्या मध्ये मी कुणालाही येऊ देणार नाही. अगदी प्रत्यक्ष माझ्या बहिणीलासुद्धा. ( तो क्षणभर तिच्याकडे पाहात राहतो.) संपाचं काय झालं ?

गिरीश : काय होणार ? आज पाचवा दिवस. काल क्लोजर डिक्लेअर केलं. पण युनियनचे लोक कारखान्याच्या आवारातून हटायला तयार नाहीत. आज त्यांच्यात आणि सिक्युरिटी फोर्समध्ये बाचाबाची झाली. काही लोकांना किरकोळ जखमाही झाल्या...

अपर्णा : (अस्वस्थपणे) नको ते वळण मिळत चाललंय या संपाला ! मारामाऱ्या करायचं काय कारण ?

( दारावरची बेल वाजते. रेजी जाऊन दार उघडतो. )

नितीन आला असेल !

गिरीश : काय सांगायचं त्याला ?

अपर्णा : तुम्ही नका काळजी करू. काय सांगायचं ते मीच सांगेन.

(रंगास्वामी येतात. रेजी जाताना चहाचा कप नेतो.)

रंगा० : कळली आजची बातमी ? डोकी फोडायला लागलेत एकमेकांची.

गिरीश : प्रकरण या थराला जाईल, असं वाटलं नव्हतं.

रंगा० : म्हणूनच मुद्दाम आलो सांगायला. कारखान्याच्या क्लोजरनं सगळे पिसाळून गेलेत. असंच हवं होतं साल्यांना ! अंगावर उकळतं तेल पडल्यासारखे तडफडताहेत ! मरू देत जळून !

गिरीश : किती भयंकर बोलता स्वामी !

रंगा० : तुम्ही एक्झिक्यूटिव्हज हेड ऑफिसला एअरकंडिशंड केबिनमध्ये शांत बसलेले असता म्हणून ! आमच्यासारखा कामगारांशी डायरेक्ट कॉन्टॅक्ट येत असता तुमचा, तर तुम्हीही असेच संतापला असता. अहो, काय सांगायचं तुम्हांला . युनियनमधल्या लोकांनी तर म्हणे एका बस ड्रायव्हरला घरातून खेचून काढून मारलं !

अपर्णा : किती दिवस चालायचं हे असं ?

(फोन वाजतो. अपर्णा फोन घेते.)

हलो .. मिसेस पोतदार ! कोण... ? मिस्टर रंगास्वामी ? हो ...आले आहेत. देते हं त्यांना फोन ! प्लीज होल्ड ऑन.

(नाव ऐकताच उठलेले रंगास्वामी फोन घेतात.)

रंगा० : हल्लो .. रंगास्वामी स्पीकिंग ! काय ?... बाप रे !... बरंच लागलंय ? असं ?... हॉस्पिटलमध्ये पोचवला ना ?... ओके. मी येतो रात्री. थँक्यू.

(फोन ठेवतो.)

अपर्णा : काय झालं स्वामी ?

रंगा० : भीती वाटत होती तेच झालं. फॅक्टरी-गेटवर बॉम्ब फुटला.

अपर्णा : बाई... ग ऽ !

रंगा० : एकजण जखमी झालाय !

गिरीश : कोण ?

रंगा० : युनिअन वर्कर्सपैकीच आहे... गोपीनाथ कदम म्हणून !

गिरीश : गोपीनाथ !

रंगा० : खरं तर त्याला काही कारण नव्हतं जखमी होण्याचं. पण आपला तो वॉचमन आहे ना... बहादुरसिंग ? तो... लढाईत एक पाय दुखावलेला जवान... त्याला वाचवायला गेला आणि स्वतः जखमी झाला !

गिरीश : गोपीनाथ... गोपीनाथ जखमी झाला ?

अपर्णा : यांच्या कॉलेजात होता तो ! म्हणून एवढं वाटतंय यांना.

गिरीश : त्याच्या ट्रीटमेन्टची काय व्यवस्था केलीय ?

रंगा० : केइएम् हॉस्पिटलमध्ये ठेवलाय त्याला. पण जखमा बऱ्याच झाल्यायत म्हणे.

गिरीश : (एकदम भावनावश होऊन) तो वाचला पाहिजे, रंगास्वामी !... माझी पर्सनल रिक्वेस्ट आहे तुम्हाला. पैशाकडे पाहू नका. मोठ्यातले मोठे डॉक्टर आणा ! .. पण त्याला वाचवा असंच समजा, की तो जखमी झाला नाहीये.. मी ..मी स्वतःच जखमी झालोय. माझ्यासाठी कराल

ते सगळं त्याच्यासाठी करा. मी स्वतः त्याच्यासाठी वाटेल तेवढा खर्च करायला तयार आहे! पण त्याचं काही बरंवाईट होता कामा नये! तुम्हाला समजावून सांगता यायचं नाही मला. पण हा माझ्याच जीवन-मरणाचा प्रश्न आहे!

(क्षणभर शांतता. मग बेल वाजते. तिघेही दचकल्यासारखे होतात. मग अपर्णा दार उघडायला जाते.)

**रंगा० :** डोन्ट बी सो एक्सायटेड, मिस्टर पोतदार. आइल लुक आफ्टर हिम प्रॉपरली. त्याची कुंडली पण आज बघून टाकतो. आय ॲम शुअर; लॉर्ड व्यंकटेश विल प्रोटेक्ट हिम!

(मणी दलाल येतो. भयंकर वैतागलेला.)

**मणी :** अरे चाललंय काय तुम्ही लोकांनी? आज थर्टीन्थ. परवा सकाळी पेपरला ॲड् यायची तर ती लेटेस्ट बाय टुमारो मॉर्निंग जायलाच हवी! आणि अजून तुमच्या इन्स्ट्रक्शन्स नाहीत! आता कॉपी कधी तयार करणार? आणि ब्लॉक्स?

**रंगा० :** कसली ॲड हवीय याला?

**मणी :** फिलिपाइन्सच्या कन्साइनमेन्टची. परवा माल जहाजावर चढायचा आहे ना?

**गिरीश :** मणी .फर्गेट दॅट् ॲड्.

**मणी :** (किंचाळून) काय?

**गिरीश :** कन्साइनमेन्टची ॲड अजिबात छापायची नाही.

**मणी :** अजिबात छापायची नाही? म्हणजे मिस डिसूझाचा हार्टफेल होणार!

**गिरीश :** ऑल्सो फर्गेट मिस डिसूझाज हार्ट. कन्साइनमेन्ट एवढ्यात जात नाहीये... त्यामुळं त्या जाहिरातीची गरज नाहीये. त्याच्याऐवजी दुसरी एक जाहिरात द्या. काल, म्हणजे ट्वेल्थ पासून, भारत मॅकिकनची डिझेल इंजिन फॅक्टरी बंद आहे. मारामाऱ्या आणि विध्वंसक कारवायांमुळे यंत्रसामुग्रीला धोका पोचेल, म्हणून कंपनीच्या मॅनेजमेन्टला क्लोजर डिक्लेअर करणं भाग पडलेलं आहे.

**रंगा० :** नुसती टाळेबंदी नाही...कंप्लीट क्लोजर!

**मणी :** काही खरं नाही...काही खरं नाही. धिस कन्ट्री इज गोईंग टु डॉग्ज. एक्सपोर्ट्स वाढवायचे सोडून आपण फॅक्टरीच बंद करतोय! वा मिस्टर पोतदार, ॲज ॲन एक्सपोर्ट मॅनेजर, यु शुड बी अशेम्ड.

**गिरीश :** डोन्ट वरी, आय ॲम् प्रॉपरली अशेम्ड.

**मणी :** लगेच सांगायला हवं मिसेस डिसूझाला. ताबडतोब कॉपी तयार व्हायला पाहिजे ना?

रंगा० : इफ यू डोन्ट माइन्ड, सर, क्लोजरची जाहिरात लिहिणं तुमच्या त्या नखरेल जाहिराती देण्याएवढं सोपं नाही. ( खिशातून एक कागद काढून ) हा घ्या ड्राफ्ट. सॉलिसिटर बजाजनी तयार केलाय. आजवर दीडशे कंपन्या बंद केल्यात बजाजनं. घ्या.

मणी : ( कागद घेऊन, हिंस्रपणे ) ऑल राइट. आइल यूज धिस.

गिरीश : आणि मिस्टर दलाल, या जाहिरातींची परवाच्या पेपर्समधली पाच कटिंग्ज माझ्याकडे पाठवून द्या.

मणी : ओ के, गुडनाइट. ( चाव्या फिरवत ) मिस्टर रंगा .. केअर फॉर अ लिफ्ट ?

रंगा० : हो...आलोच. मिस्टर गिरीश, मी आता जातोच हॉस्पिटलवर, गोपीनाथला बघायला.

गिरीश : मीही येतो.

रंगा० : नो नो, मिस्टर पोतदार, यु शुड नॉट. त्या युनिअनवाल्याला तुम्ही बघायला गेलात तर त्याचा भलताच अर्थ होईल. मी जाऊन येतो. सीरिअस असेल तर फोन करतो तुम्हाला.

गिरीश : नक्की कराल ?

रंगा० : हंड्रेड पर्सेन्ट. बट लेट मी टेल यू...यू आर टेकिंग हिम टू सीरिअसली. अहो, तुमच्यासारखा रिफाइन्ड माणूस आताच ॲक्सिडेन्टली लेबरमध्ये आलाय ! ही संपाची पहिलीच वेळ म्हणून चक्रावून गेलाय ! पण आम्ही आयुष्यभर लेबर हाकत आलोय ना ? आता हे काही मनावर उमटत नाही आमच्या. अहो हे जंगल आहे जंगल. झाडपाल्याचं नाही...पण लाकडा लोखंडाचं. इथं वाघसिंह नाहीत, पण साप आहेत, माकडं आहेत, नि चिचुंद्रया आहेत. इथं फिरताना माणूस सावध हवा... नाही तर गांधीलमाशादेखील डंख मारतील ! धास्ती हवी.. पण दुःख ? कुणासाठी हो रडायचं इथं ? या प्राण्यांसाठी ?

गिरीश : (तुटकपणे) गुडनाइट मिस्टर रंगास्वामी.

( मणी व रंगास्वामी जातात. )

अपर्णा : इतकं कासाविस व्हायला काय झालं ? संपामध्ये बॉम्ब पडायचाच... आणि कुणी तरी जखमी व्हायचंच. गोपीनाथ थोडा जवळचा असेल. पण त्याबद्दल इतकं वाईट वाटून घेऊन कसं चालेल ?

गिरीश : काही तरी बोलू नकोस. मला काही वाटलेलं नाही. काहीसुद्धा नाही. मी या सगळयाला तोंड देईन. शेवटपर्यंत तोंड देईन. (आत निघून जातो.)

अपर्णा : गिरीश . ( ती त्याच्या पाठीमागं जाणार, इतक्यात तिच्या मनात येतं की

या क्षणी त्याला एकटंच राहू दे. ती मागं फिरते.)

(एवढ्यात दारावरची वेल वाजते.)

रेजी...कोण आलंय बघ...

(रेजी दार उघडतो. अपर्णा प्लेअरशी जाते आणि एक आनंदी पाश्चात्य संगीताची रेकॉर्ड लावते. नितीन आत येतो. रेजी निघून जातो.)

**नितीन :** अंजली आहे ?

**अपर्णा :** हो, बसा.

**नितीन :** संपाची काय बातमी ?

**अंजू :** खूप चिघळलाय. आता तर एकमेकांची डोकी फोडताहेत. कशासाठी कोण जाणे !

**नितीन :** मागण्या मान्य व्हाव्यात म्हणून !

**अपर्णा :** म्हणून मारामारी करायची ? मी म्हणते मागण्या मान्य करून घेण्यासाठी मिटिंग्ज भरवा, घोषणा द्या, पोस्टर्स लावा, ट्रायब्युनलपुढं केस न्या... पण रक्तपात कशासाठी ? हे लोक नेहमी भांडवलदारांना शिव्या देतात. पण इथं यांना रक्त सांडायला भांडवलदारांनी का सांगितलंय ? गरिबांचं रक्त गरीबच पितात आणि नाव मात्र श्रीमंतांचं !

(क्षणभर नुसतं संगीतच ऐकू येत राहतं. मग...)

**नितीन :** अंजली काय करतेय ?

**अपर्णा :** डायरी लिहीत बसलीय.

**नितीन :** लिहीत असेल तर नका डिस्टर्ब करू.

**अपर्णा :** नाही करीत. मलाच तुमच्याशी थोडं बोलायचंय.

**नितीन :** तुम्हाला ?

**अपर्णा :** (रेकॉर्ड संपलेली. अपर्णा प्लेअर बंद करते.) तुम्ही अंजलीला प्रपोज केलंय, खरं ना ?

**नितीन :** (आश्चर्यानं) तुम्हाला कळलं ?

**अपर्णा :** तिनंच सांगितलं. बट् आय ॲम सॉरी टु टेल यू नितीन– आहे या परिस्थितीत तुमचं लग्न होणं शक्य नाही !

**नितीन :** का ? ती तसं म्हणते ?

**अपर्णा :** ती म्हणत नाही नितीन– कंपनीज ॲक्ट म्हणतो. आज ना उद्या मिस्टर पोतदार कंपनीचे डिरेक्टर होतील. ते डिरेक्टर असताना त्यांच्या नात्यातल्या कुणालाच ऑफिस ऑफ प्रॉफिटवर असून चालायचं नाही !

**नितीन :** याचा अर्थ...

**अपर्णा :** याचा अर्थ तुम्हाला भारत मॅक्किनमधली नोकरी तरी सोडावी लागेल

किंवा अंजलीला तरी...

**नितीन :** तुम्ही मला... नोकरी सोडायला सांगताय ?

**अपर्णा :** बिलकुल नाही... उलट भारत मॅकिकनमध्ये तुम्हाला अतिशय चांगले प्रॉस्पेक्ट्स आहेत. मिस्टर पोतदारांसारखे चढत जाऊन एके दिवशी तुम्हीही कंपनीचे डिरेक्टर व्हाल! महत्त्वाकांक्षा ठेवा! काहीच अशक्य नाही!

**नितीन :** मग ?

**अपर्णा :** पण या महत्त्वाकांक्षेसाठी तुम्हांला अंजलीवरचं प्रेम सोडावं लागेल.

**नितीन :** (चिडून) तुम्ही इतक्या निर्विकारपणे हे सारं मला सांगताय तरी कसं ? अंजलीवरचं प्रेम विसरून जा, म्हणताना, तुम्हांला काहीच वाटत नाही ?

**अपर्णा :** वाटतंय ना! खूप वाईट वाटतंय मला. माझ्या बहिणीनंही माझ्यासारखंच भारत मॅकिकनच्या एक्झिक्यूटिव्हची बायको व्हावं, असं फार मनात होतं माझ्या.

**नितीन :** ठीक आहे.

**अपर्णा :** मग, काय करणार आहात तुम्ही ?

**नितीन :** मी निघतो.

**अपर्णा :** थांबा नितीन. तुम्हांला वाटत असेल की मी फार कठोरपणे वागतेय. सगळ्या सुंदर भावना मी भारत मॅकिकनच्या नियमांमध्ये दडपून टाकल्या-यत. पण मी काय करू नितीन ? मला स्वतंत्र भावना असायचा अधि-कारच नाही. मी एक्झिक्यूटिव्हची बायको आहे, आणि माझ्या भावना मला कंपनीच्या नियमांप्रमाणंच घडवायला हव्यात. हे एक व्रत आहे नितीन. उद्या तुम्ही यशस्वी एक्झिक्यूटिव्ह झालात, तर तुमच्या बायको लाही तेच व्रत पाळावं लागेल.

(अंजली येते.)

**अंजू :** नितीन...

( तो न बोलताच निघून जातो. ती दाराशी धावत जाते. )

नितीन...( दार धाड्दिशी लावल्याचा आवाज. ती परत येते. ) असा काय गेला ग हा एकदम ?

**अपर्णा :** मला काय माहीत ?

**अंजू :** अग पण तो आल्याचं मला सांगितलंसुद्धा नाहीस! आता रेजी सहज म्हणाला, तेव्हा मला कळलं. ताई, तू काही बोललीस त्याला ?

( गिरीश येतो...तशी अंजली गप्प होते. )

( तो कपाटाशी जातो, आणि बाटली काढतो. ग्लास काढतो आणि त्यात

मद्य ओततो, सोडा ओततो व पिऊ लागतो. अंजली आणि अपर्णा बघत राहतात. त्यांची नजर गिरीशला जाणवते.)

**गिरीश :** हॅलो अंजली...(हसण्याचा प्रयत्न करीत) बघत काय राहिलीस? व्हिस्की पिणं काही नवीन नाही इथं.

**अंजली :** नसेल; पण गेल्या आठ दहा दिवसांत मी पाहिलं नव्हतं तुम्हांला कधी एकट्यानं घेताना. असं तर नाही?– की तुमचा काही तरी विसरण्याचा प्रयत्न चाललाय?

**गिरीश :** विसरण्याचा? छे... दुःख असेल तर ना ते विसरणार? अंजू, माझे गुरू– शशिभूषण मैत्र म्हणून होते... भलताच नेकीचा माणूस. सर्व्हिस अर्धी सोडून निघून गेला. ते नेहमी म्हणायचे, आदर्श मॅनेजर कधीही भारावून जात नाही. दुःखानं नाही की सुखानंही नाही. पण मला ते थोडं कठीण जातं. मनात नको ते विचार येतात. काही काही गोष्टी मनाला लागूनही राहतात.

**अंजली :** कुठल्या गोष्टी? संपाच्या?

**गिरीश :** संप? मला नाही वाटत त्याचं काही! अग आता हे सगळं स्टँडर्ड होऊन गेलंय. जे व्हायचं असेल ते होईल. फॅक्टरी बंद राहील– काही लोक उपाशी राहतील. काहीजण बायकोचे दागिने विकतील, काही पठाणाकडे धाव घेतील. काही लोक गेटसमोर उभे राहून गरमागरम भाषणं झोडतील. काहींची डोकी फुटतील. अन मग एक दिवस सगळं परत ठाकठीक होऊन जाईल. फर्गेट इट्!

**अपर्णा :** (त्याची परिस्थिती लक्षात घेऊन) बेतानं घे गिरीश. तू नेहमी घेत नाहीस.

**गिरीश :** सो व्हॉट? आइल ऑलवेज बी इन कंट्रोल. दुःख वाढेल, इतकी नाही घेणार. खरोखरी विचार करावासा वाटेल, इतकी नाही घेणार. वरचा सगळा वर्ख खरवडून आतमधली खरीखुरी परिस्थिती दिसेल, इतकी नाही घेणार.

**अंजू :** माझा नाही विश्वास बसत. गिरीश, खरंच का फॅक्टरीत संप झाला तरी तुम्हांला त्याचं काही वाटत नाही? माणसं मोठी होतात तसतसं त्यांना इतरांचं दुःख समजेनासं होतं, असाच का याचा अर्थ?

**गिरीश :** (एव्हाना त्याला चांगलीच किक लागलेली.) तू जास्त विचार करतेस ना, म्हणूनच गोंधळ उडतो तुझा. नाहीतर तुझी ताई बघ...मी बघ... आम्ही करतो विचार? तिकडे फॅक्टरी बंद पडली...संप झाला...बॉम्ब फोडले...डोकी फुटली, तरी मी इथं दारू पीत बसू शकतो की नाही?

आहे कुणी मला विचारणारं ? नाही. का नाही ? तर माझी या सगळ्या प्रकारातली जबाबदारी...लिमिटेड आहे. कुणापुरती लिमिटेड ? तर स्वतःपुरती. आमच्या कंपनीसारखीच प्रायव्हेट लिमिटेड. आम्ही कशाची काळजी करणार ? स्वतःच्या प्रगतीची. कारण लायबिलिटी स्ट्रिक्टली लिमिटेड. कंपनी प्रायव्हेट लिमिटेड... !

**अंजू :** मग माझ्या शंकांना तुमच्याकडून कधीच उत्तरं मिळायची नाहीत. ज्याला इतरांचाही विचार करता येतो, अशाच कुणाला त्या विचारायला हव्यात.

**अपर्णा :** म्हणजे कुणाला ? गोपीनाथला ?

**गिरीश :** या क्षणी तरी तू गोपीनाथला काही विचारू शकत नाहीस. कारण तो हॉस्पिटलमध्ये आहे. केइएम्‌मध्ये.

**अंजू :** (चमकून) काय म्हणालात ?

**गिरीश :** आज फॅक्टरीवर बॉम्ब फुटला– त्यात गोपीनाथ जखमी झाला– मला फोन आला होता. त्या क्षणापासून जसा काही तो हालत नाहीये माझ्या डोळ्यांपुढून.

**अपर्णा :** (तीव्रपणे) त्याला विसरण्यासाठी पीत बसलाहेस आज ?

**अंजू :** ताई, मी हॉस्पिटलमध्ये जाते. गोपीनाथला बघून येते.

**अपर्णा :** आता एवढ्या उशिराची कुठं जातेस ? उद्या जा...

**अंजू :** नाही ताई, मला गेलंच पाहिजे.

**अपर्णा :** पण सलीम नसेल खाली...

**अंजू :** नसू दे ड्रायव्हर. मी बसनं जाईन. (जाते.)

(उघड्या दारातून रमाकांत लवंगे आणि नयना आत येतात.)

**नयना :** या कुठं गेल्या एवढ्या उशिराच्या...एकट्याच ?

**अपर्णा :** येईल...जवळच गेलीय. या ना !

**रमाकांत :** (गिरीशला) आय ॲम टेरिब्ली सॉरी... फॅक्टरी बंद झाली म्हणजे... क्रायसिस आता !

**नयना :** ऐकलं आणि कससंच झालं !

**रमाकांत :** पण ऑफिसात भेटायची चोरी ! आपण इन मिन दोनच मराठी माणसं ! लोक म्हणणार, चालला लगेच डोळे पुसायला !

**नयना :** पण असं कसं हो झालं ?

**रमाकांत :** इज द न्यूज करेक्ट ? तुला म्हणे सेल्समधून हालवताहेत ? नॉन्सेन्स ! तुझ्यासारखा ब्रिलिअंट ऑफिसर दुसरा कोण मिळणार आहे यांना ?

**नयना :** या ऑफिसात असंच. कुणावर कधी काय प्रसंग येईल, सांगता येत नाही ग बाई !

**रमाकांत :** म्हणून म्हटलं— भेटून खात्री करून घेऊया !

**नयना :** हो, प्रसंगाला चौकशी करायला आलो नाही तर शेजारी कशाला म्हणायचं ?...

**रमाकांत :** मला फार वाईट वाटतं गिरीश, तुझ्यासारख्या हुषार माणसाचं हे असं व्हावं. तू बोलत का नाहीस गिरीश काही ?

**गिरीश :** काय बोलू मित्रा ! तुम्ही दाखवलेल्या या आपुलकीनं मी अगदी भारावून गेलोय. अशा संकटाच्या वेळीच आपला कोण आणि परका कोण याची ओळख पटते ! तुम्ही म्हणता ते अगदी खरं आहे ! मी इतके मोठमोठे बेत रचले होते...पण हे सगळं असं कोसळेल याची मला काय कल्पना ? फॅक्टरी बंद पडली, कन्साइनमेन्ट तर आता जाणंच शक्य नाही ! मॅनेजमेन्ट या सगळ्यानंतर मला कुठं टाकतेय कोण जाणे ! अशा प्रसंगात, दोस्त, मला केवळ तुमच्या मैत्रीचाच आधार आहे रे !

(सावकाश अंधार होत जातो.)

**शनिवार : १६ मार्च : दुपार.**

(रंगमंचाच्या दोन्ही बाजूंना प्रकाशझोत. रमाकांत लवंगे नयनाला फोन करीत आहे.)

**रमाकांत :** अग काय सांगू तुला, पुरती वाट लागली वाट !

**नयना :** म्हणजे ? असं झालं तरी काय ?

**रमाकांत :** काय व्हायचं ? दि एन्ड !! आमच्या सगळ्या अॅंबिशनचा पार बट्ट्याबोळ !

**नयना :** नीट सांग ना, काय झालं ते !

**रमाकांत :** कसं सांगू ? तुला खरंदेखील वाटायचं नाही. आज सोळा तारीख...तेरा तारखेला आपण गिरीशकडे जाऊन त्याचं सान्त्वन केलं, आणि आज चक्क सर्क्युलर निघालंय—

**नयना :** काय ?

**रमाकांत :** गिरीश पोतदार कंपनीचा अॅडिशनल डिरेक्टर झाला !

**नयना :** (विश्वास न बसून) काय म्हणालास ?

**रमाकांत :** फिलिपाइन्सला माल गेला नाही तो नाहीच ! फॅक्टरीत संपही चालूच आहे... आणि याला मात्र कंपनीनं डिरेक्टर केलंय ! आज सकाळी तातडीची मीटिंग घेऊन जाहीर केलं हॅरिसननं.

**नयना :** पण हा चक्क अन्याय आहे ! तुला बाजूला सारून त्याला डिरेक्टर करायचं ? तेसुद्धा त्यानं एवढा गोंधळ करून ठेवला असताना ?

**रमाकांत :** बघ ना !

**नयना :** पण डार्लिंग, काही झालं तरी तू मनातलं बाहेर दाखवू नकोस हं ! सरळ जाऊन त्याचं अभिनंदन करून ये.

**रमाकांत :** मेलो तरी मी त्याचं अभिनंदन करणार नाही !

**नयना :** वेडेपणा करू नको ! आता तो डिरेक्टर झालाय ! त्याच्याशी फटकून वागून कसं चालेल ?

**रमाकांत :** नयन, तू जखमेवर मीठ चोळतेयस !

**नयना :** तसं नाही रे बाबा. तुझ्या भावना समजतात मला. पण बी प्रॅक्टिकल. आपण दोघं जाऊन येऊ फॉरमॅलिटी म्हणून फक्त पाच मिनिटं. काय करायचं ? प्रसंग आला, तो निभावून न्यायला पाहिजे. मी फुलांच्या बुकेची ऑर्डर देते हं मग– संध्याकाळसाठी ! पण बाई मला अजून खरं वाटत नाही... गिरीश डिरेक्टर झाला कसा ?

(दोन्हीकडचे प्रकाशगोल विझतात.)

## प्रवेश दुसरा

**शनिवार १६ मार्च : संध्याकाळ.**

(दिवाणखान्यातील दृष्य हळूहळू प्रकाशमान होत जातं.)

**अपर्णा :** (अंजलीला) मला खरंसुद्धा वाटत नाही ग. कालपर्यंत आपण सगळी काळजीत होतो आणि आज हा एकदम डिरेक्टर झाला कसा ! अगदी स्वप्नासारखंच वाटतं, नाही ग ? त्यातून हा डिरेक्टर झाला नि लगेच संप मिटला. म्हणजे याचाच पायगुण म्हणायला हवा ! एवढा आनंदाचा दिवस आणि तू कशी ग चाललीस आजच ?

**अंजू :** मला जायलाच हवं ताई. रिझर्व्हेशनसुद्धा केलंय् मी.

**अपर्णा :** मग काय झालं ? ते कॅन्सल करता येईल. खरंच, राहा ना, आणखी आठवडाभर तरी. बघशील आता तू काय गंमत येईल ! नुसत्या पार्ट्यांवर पार्ट्या होतील !

**अंजू :** (हसून) तो भडिमार सुरू व्हायच्या आधीच इथनं पळून गेलेलं बरं.

**अपर्णा :** (खिडकीतून पाहून) अय्या... आपली गाडी आली. रेजी– पळ, साहेब आले– त्यांच्या हातातलं सामान घेऊन ये...

(रेजी जातो.)

खरंच अंजली,– इतकं थ्रिल्ड वाटतंय ! नवरा एवढ्या मोठ्या कंपनीचा डिरेक्टर होऊन आला– तोसुद्धा आपल्या स्वतःच्या कर्तृत्वावर...हे पाहायचं भाग्य कितीजणींना लाभत असेल ?

(हे बोलता बोलता तिनं एका अत्यंत शोभिवंत तबकात पंचारतीसाठी निरांजनं लावलेली. एकदम गिरीश आत शिरतो. त्याच्या हातावर एक हार. बाकीचे हार, गुच्छ इत्यादी त्याच्याबरोबर असलेल्या रंगास्वामींनी धरलेले. पाठीमागं रेजी उरलेले गुच्छ, मिठाईच्या बॉक्सेस इत्यादी कसंबसं सावरत आलेला.)

अरे थांब, थांब!... मी दारात ओवाळायला येणार तो आपला सगळ आत घुसला!

**गिरीश :** (हसत हसत) अग मग इथंच ओवाळ. त्यात काय आहे?

(अपर्णा त्याला ओवाळते आणि कपाळाला गंधाक्षतांचा टिळा लावते. तो हसत हसत हातातला हार तिच्या गळयात घालतो.)

टु द वूमन बिहाइन्ड माय सक्सेस!

**अपर्णा :** (भारावून) माझं काही नाही हं! हे सगळं तुझंच,– अगदी एकटयाचं तुझंच कर्तृत्व आहे!

**गिरीश :** असं म्हणतेयस, पण तुला कल्पना नाही! माझ्या मनात चलबिचल झाली असताना तूच मला धीर देत आलीयस! तू जर डिरेक्टर होण्यासाठी माझ्यामागं रोज कटकट केली नसतीस तर...

**अपर्णा :** कटकट काय? (गिरीश हसतो.)

(रेजी काही वस्तू घेऊन घरात जातो.)

**गिरीश :** आणि अंजली– तू का गप्प?

**अपर्णा :** आज रात्रीच्या गाडीनं जाणारेय ती.

**गिरीश :** ओ! नो! नथिंग डुइंग! अजून आठ-पंधरा दिवस तरी जायचं नाहीस तू!

**अंजली :** (हसून) सॉरी, डिरेक्टरसाहेब. आपण कंपनी कंट्रोल करू शकता. पण आमची लहान माणसांची कामं– ती आम्हांलाच सांभाळावी लागतात.

**रंगा० :** बाकी आजची युनियनबरोबरची मीटिंग ती तुमच्यामुळंच निभावली साहेब. साले माझ्याशी नुसता शेकहॅंड करायलासुद्धा तयार नव्हते. तुमच्याशी मात्र ताबडतोब केला!

**गिरीश :** (हाताकडे पाहून, काही क्षण विचारात) हो– माझ्याशी केला!

**रंगा० :** आज माझ्या वाइफचं ब्लडप्रेशर नॉर्मलवर येईल. कालपर्यंत सर घरी फोन करून स्लोगन्स ऐकवत होते– 'रंगास्वामीचं मुंडकं उडवा!' माझी वायको तर भीतीनं पांढरीफटक पडली होती! मी मात्र घाबरलो नाही. म्हटलं सोळा तारखेपर्यंत धीर धर. सोळाला लिब्रामध्ये एक ड्रॅस्टिक चेंज आहे.

**अपर्णा :** (अंजलीला) चल ग– आपण तयारी करू. आज एकसारखी मंडळी येत राहणार!

( पंचारती, हारतुरे आणि मिठाईचे पुडे वगैरेपैकी रेजीनं न्यायच्या राहिलेल्या वस्तू घेऊन दोघी आत जातात. )

**रंगा० :** तुम्हांला माहितेय सर, आज या कामगारांनी मोठी मिरवणूक काढलीय विजय झाल्याबद्दल! पार पेकाट मोडलंय, तरी लोकांना दाखवताहेत की आपणच जिंकलो!

**गिरीश :** तसं वाटून घ्यायलाच पाहिजे त्यांनी. नाही तर त्यांचा आत्मविश्वास खचेल. ती माणसं जिवंतच राहू शकणार नाहीत.

**रंगा० :** माणसं? साहेब माणसं कसली ही? यांच्यापैकी प्रत्येकाच्या आत एक हरामखोर डुक्कर असतं डुक्कर! त्या डुकराला अधूनमधून खायला घालायला लागतं आणि मधून मधून चोपूनही काढावं लागतं. तरच ते नीट वागतं. ही डुकरं पाळायला शिका साहेब... तरच सक्सेसफुल डिरेक्टर व्हाल!

**गिरीश :** छी छी,– रंगास्वामी, माणसाबद्दल तुमचं इतकं वाईट मत? इतकी घृणा? इतका तिटकारा...?

**रंगा० :** उगाच नाही सांगत साहेब. या लाकडालोखंडाच्या जंगलात होल लाइफ घालवल्यानंतरचा माझा स्वतःचा अनुभव सांगतो आहे.

**गिरीश :** रंगास्वामी, प्रत्येकजण स्वतःवरूनच दुसऱ्याची कल्पना करतो. एक्स्क्यूज मी. पण आजवर तुम्ही कंपनीत फक्त पोट भरण्यासाठीच राहिलात, मद्रासला परत न्यायला किती पैसा जमेल, एवढाच विचार केलात, आणि ग्रहांवर नि लॉर्ड व्यंकटेशावर भार टाकून भिऊन भिऊन दिवस काढलेत. म्हणून तुम्हांला माणूस असा डुकरासारखा दिसतो,– खादाड, स्वार्थी, भित्रा! पण तसं नाहीये रंगास्वामी,... माणसाच्या पुष्कळ जाती असतात. फॉर इन्स्टन्स, मी तुमच्याहून कदाचित अधिक वाईट असेन, पण मी वेगळ्या जातीचा आहे एवढं नक्की! ( फोनची बेल वाजते. गिरीश फोन घेतो. ) हलो– येस, गिरीश पोतदार स्पीकिंग! थँक्यू, थँक्यू व्हेरी मच! ऑफ कोर्स, इट वॉज टोटली अनेक्स्पेक्टेड!

( दारावरची बेल वाजते. रंगास्वामी दार उघडायला जातात. )

नो, नो, आय मस्ट थँक द मॅनेजमेन्ट फॉर इट! एनी टाइम, सर..थँक्यू. गुडनाइट सर! ( फोन ठेवतो. )

( नितीन येतो. )

**रंगा० :** आय टेक युअर लीव्ह सर!

**गिरीश :** गुड नाइट. थँक्यू फॉर एव्हरीथिंग.

( रंगास्वामी जातो. )

नितीन : कॅाँग्रॅच्युलेशन्स, सर ! ( हातातला फुलांचा गुच्छ देतो. )
गिरीश : थँक्यू नितीन ! बस ना ! ( हाक मारतो. ) अंजली...
नितीन : आज जायचीय ना ती ?
गिरीश : जाऊ नको म्हणतोय. पण ती काय ऐकणारेय ? मनाला येईल ते करणार! ( अंजली येते. )

नितीन आलाय– बसा हं. मी कपडे बदलून येतो. (जातो.)

अंजू : त्या दिवशी एकदम असा चालता का रे झालास ?
नितीन : आजदेखील आलो ते साहेबांच्या अभिनंदनासाठीच.
अंजू : व्हेरी प्रॉपर फॉर अ बी. एम. सी. ऑफिसर !
नितीन : तू आज जाणार ?
अंजू : हो. निघेन तासाभरानं.
नितीन : तुझी हरकत नसेल तर मी येईन पोचवायला.
अंजू : नको. ताई येणारेय एनी वे, थँक्यू व्हेरी मच.
नितीन : मग ? जातो मी...
अंजू : थांब. नितीन, त्या दिवशी तू मला एक प्रश्न विचारला होतास...
नितीन : हूं.
अंजू : मग त्याचं उत्तर न समजताच जाणार आहेस ?
नितीन : उत्तर समजलंय मला.
अंजू : ( चमकून) कुणाकडून ?
नितीन : तुझ्या ताईकडून.
अंजू : काय सांगितलं तिनं ?
नितीन : तुला माहीत नाही ?
अंजू : खरंच नाही. ती काहीच म्हणाली नाही.
नितीन : मला वाटलं कंपनीचं निमित्त पुढं करून तूच मला नकार दिलास. स्वतः सांगायला अवघड वाटलं म्हणून तिच्याकरवी.
अंजू : मग तू काय ठरवलंस ?
नितीन : त्यात काय ठरवायचं ? मी सोडीन भारत मॅकिकनमधली नोकरी. माझ्या क्वालिफिकेशन्सवर आणि इथल्या थोड्याफार अनुभवावर मला दुसऱ्या कुठल्याही फर्ममध्ये असाच जॉब मिळेल.
अंजू : आणि अंगच्या हुषारीनं तू भराभर प्रमोशन्स मिळवत जाशील !
नितीन : डिपार्टमेन्टचा मॅनेजर ! मग डिरेक्टर ! मिस्टर पोतदार हा माझा आदर्श आहे.
अंजू : त्यासाठी गिरीश जसे बदलले तसं तुलाही बदलावं लागेल.

नितीन : माहितेय मला. पण महत्त्वाकांक्षेसाठी तेवढी किंमत द्यायलाच हवी.

अंजू : आयॅम सॉरी नितीन. मग मला तुझ्याशी लग्न करता येणार नाही.

नितीन : ( आश्चर्यानं ) का ?

अंजू : मला तू आवडतोस नितीन. आज आहेस तसाच आवडतोस. तुझा नम्रपणा, भाबडेपणा, तुझं कवितांवर प्रेम करणं, दुसऱ्यांचा विचार करणं, हे सगळं–सगळं मला आवडतं. पण ते सगळं बदलून जाणारेय तुझ्या महत्त्वाकांक्षेमुळं.

नितीन : कशावरून ?

अंजू : गिरीशचं काय झालं ते पाहतेय ना मी! गिरीश पूर्वी तुझ्यासारखाच होता. पण आज तो स्वतःसारखा राहिलेला नाही! तो झालाय् फक्त कमर्शिअल एक्झिक्यूटिव्ह!

नितीन : ...पण तो यशस्वी आहे!

अंजू : तूही होशील. पण सुखी होशील का ?

नितीन : मी त्याचा विचार केलेला नाही...करणारही नाही. सुखी होणं ही नशिबाची गोष्ट आहे. मी फक्त यश मिळवण्याचा प्रयत्न करू शकतो.

अंजू : यश मिळवायचं म्हणजे खूप पैसा मिळवायचा...असंच ना ?

नितीन : हो; सध्या तरी तीच माझी सुखाची कल्पना आहे. माझ्या घरी गरिबी आहे. मी कंटाळलोय त्या गरिबीला.

अंजू : माझंही घर मोठंसं श्रीमंत नाही. मलाही सुस्थितीत राहायचंय. पण माझी माणुसकी हिरावून नेईल इतका पैसा मला नकोय...वेल. आपल्या सुखाच्या कल्पनाच वेगळ्या आहेत. म्हणूनच आपलं लग्न अशक्य आहे, नितीन! तुला गिरीश व्हायचंय! पण मी आमच्या ताईसारखी झाले तर मला ती आत्महत्या वाटेल!!

(दारावरची बेल वाजते. अंजली दार उघडायला जाते. कपडे बदलून गिरीश येतो. अंजली दार उघडून परत येते. श्री. व सौ. लवंगे पुष्पगुच्छ घेऊन आलेले.)

रमाकांत : हलो गिरीश...अवर हार्टिएस्ट कॉंग्रॅच्युलेशन्स.

नयना : –टु बोथ ऑफ यू! अपर्णा कुठाय ? (अपर्णा येते.)

अपर्णा : अय्या नयना ..मला वाटलंच होतं तुम्ही याल म्हणून! थांबणार ना पार्टीला ?

गिरीश : कमॉन. ॲट लीस्ट जॉइन अस फॉर ड्रिंक्स.

रमाकांत : तू म्हणत असलास तर...

नयना : अहो थांबायला वेळच नाही आज. मावशीचा तातडीचा निरोप आहे

या म्हणून. (रमाकांतला) लक्षात आहे ना ?

**रमाकांत :** विसरलोच होतो.

**नयना :** माझी सख्खी मावशी! जॉन्सन ॲन्ड मेयो कंपनीच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सवर आहेत तिचे यजमान. कधीपासून यांना बोलावताहेत डिरेक्टर म्हणून. पण हे बी. एम्. सी. सोडायला तयार होतील तर ना!

**रमाकांत :** गिरीश, आता तुम्ही 'ब्लू स्टोन' सोडणार असाल, नाही ?

**अपर्णा :** हो बाई, फार त्रास काढला इथं. सेपरेट बंगला असल्यानंतर खूप प्रश्न सुटतील!

**नयना :** दुसरीकडे गेलात तरी विसरू नका हं आम्हांला!

**रमाकांत :** येतो हं ..(दोघेही गडबडीनं जातात.)

**नितीन :** मीही निघतो. घरी जाऊन येतो स्टेशनवर. गाडीच्या वेळेपर्यंत.
(जातो. फोनची रिंग वाजते. गिरीश फोन घेतो.)

**अपर्णा :** अंजू, मी तयारी करायला लागते हं... (जाते.)

**गिरीश :** (फोनवर) थँक्यू... नो... नॉट टुमॉरो. सन्डे ऽ टर्फ क्लबवर पार्टी आहे. मन्डे चालेल. नो फॉरमॅलिटीज, जस्ट अ कपल ऑफ ड्रिंक्स. ओ. के .. सी यू....थँक्यू. गुड नाइट.
(फोन ठेवून तो वळतो. इतक्यात उघड्या दारातून रंगास्वामी आलेले दिसतात. तो दचकतो.)

**गिरीश :** रंगास्वामी...! परतसे आलात ?

**रंगा० :** एक न्यूज द्यायला आलो. आताच हॉस्पिटलला फोन केला होता. रोज करीतच होतो. सकाळ संध्याकाळ! ॲंड ॲक्च्युअली ही वॉज रिकव्हरिंग!

**गिरीश :** (ओळखून) गोपीना...थ ?

**रंगा० :** होय आहेब. तो एक्सपायर झाला

**गिरीश :** कधी ?

**रंगा० :** आत्ता, संध्याकाळीच.

**गिरीश :** गोपीनाथ गेला ? मला खरंच वाटत नाही, स्वामी. नशीब मला इतकी क्रूर शिक्षा देईल हे पटतच नाही! गोपीनाथ! कालच तर मी त्याला हॉस्पिटलमध्ये बघून आलो, तुमचं न ऐकता. सर्वांग अंगाला बँडेज बांधलेलं होतं. चेहरादेखील पांढऱ्या पट्ट्यांनी झाकला होता.. फक्त डोळे आणि ओठ उघडे होते. मला पाहिल्याबरोबर तो हसला. डोळ्यात पाणी आणून हसला .. तो मला हसला स्वामी माझ्या फजितीला हसला! त्याला समजलं होतं! तो मरणार नव्हता...माझं माणूसपणच मरणार होतं!
(प्रकाशयोजना बदलते. दूरवरून हास्य ऐकू येते. त्या पाठोपाठ शब्द:

" मॅक्बेथनं खून केला... आपल्या निद्रेचा खून केला! त्या निष्पाप निद्रेचा! आता मॅक्बेथ कधीही सुखानं झोपू शकणार नाही. त्याची सुखाची झोप आता कायमची उडाली."

पुन्हा प्रकाशयोजना पूर्ववत्.

**रंगा० :** एवढं मनाला लावून घेऊ नका साहेब. आपण काय करणार? त्याचा सेटअंच नीचीचा होता. मग आपण कितीही राजेशाही व्यवस्था ठेवली तरी काय होणार? आजकाल एवढं कोण करतं स्टाफसाठी? पण तुम्ही म्हणून...

**गिरीश :** बट ही इज डेड, रंगास्वामी? डोन्च्यू रिअलाइझ धिस?

(पुन्हा प्रकाशयोजना बदलते. शब्द ऐकू येतात :

".. सात समुद्रांचं पाणी एकत्र करून ओतलं तरी मॅक्बेथच्या हातावरचे हे रक्ताचे डाग धुतले जायचे नाहीत! उलट या रक्तामुळं साता समुद्राचं निळंभोर पाणी मात्र तांबडंलाल होऊन जाईल!"

प्रकाशयोजना पूर्ववत्.)

**रंगा० :** मला वाटलंच होतं, साहेब, तुम्हांला फार फील होईल! म्हणून तर मी तुमच्या नावानं एका हाराची ऑर्डर दिली! स्लिपसुद्धा तयार केलीय्... इन डीप सिम्पथी फ्रॉम मिस्टर गिरीश पोतदार, डायरेक्टर. वर्डिंग बरोबर आहे ना, सर? तुम्हांला फारच वाईट वाटत असेल तर हार शंभर रुपयांचा करतो, सर!

**गिरीश :** मी येतो तुमच्याबरोबर स्मशानात ..मी माझ्या हातांनी घालतो तो हार त्याच्या देहावर.

**रंगा० :** त्याची गरज नाही साहेब! एका सामान्य क्लार्कच्या प्रेतयात्रेला डिरेक्टरनं जाणं हे पद्धतीला धरून नाही. यू डोन्ट ओ इट टु हिम्. नो. नॉट ॲट ऑल. फार फार तर त्याच्या वडिलांना उद्या एक पत्र टाकू. आपल्या सॉलिसिटर्सनी केलेला ॲप्रुव्हड ड्राफ्ट आहे– त्यावर नुसती सही करून टाका.

**गिरीश :** तेवढ्यानं भागायचं नाही स्वामी– मला यायलाच हवं स्मशानात.

**रंगा० :** नो सर. आय सजेस्ट, यू शुड नॉट कम. कामगारांपैकी बरेच जण तिकडे येतील. डायरेक्टरला पाहून त्यांनी काही स्लोगन्स दिल्या आणि प्रकरण पुन्हा चिघळलं तर वाट लागेल.

**गिरीश :** (असहाय.) ठीक आहे. मी येत नाही. जा तुम्ही.

**रंगा० :** येतो सर. डोन्ट वरी. सगळा अंत्यविधी नीट पार पडेल असं पाहतो. कंपनीच खर्च करणार आहे. (जातो.)

(रंगास्वामी जातो, आणि एकदम गिरीशच्या लक्षात येतं की खोलीत आणखी कुणीतरी आहे. अंजली. इतका वेळ ती काहीच बोललेली नाही. तिचा जसा काही दुःखानं दगड झाला आहे...)

गिरीश : (दचकून) अंजू...तू इथंच होतीस? अंजू...बोल ना काहीतरी. (तिच्या जवळ जात) अं...

अंजू : (किंचाळून) हां ऽ तुमचे हात दूर करा! त्यांना रक्त लागलंय!

गिरीश : अंजू– असं काय करतेस?

अंजू : खुनी! खुनी आहांत तुम्ही!

गिरीश : नाउ– नाउ...मला समजतात अंजू—तुझ्या गोपीनाथविषयीच्या भावना मला समजतात! पण त्यांच्याच माणसांनी फॅक्टरीवर बॉम्ब टाकला! वॉचमनला वाचवताना गोपीनाथ ..

अंजू : हे सारं तुम्ही जगाला सांगा! तुमच्या कंपनीला सांगा– नाहीतर पत्रकारांना बोलावून प्रसिद्ध करा! पण जगात एका व्यक्तीला मात्र तुम्ही फसवू शकणार नाही–मला!!

गिरीश : म्हणजे?

अंजू : तुम्ही खुनी आहांत! एकट्या गोपीनाथचे नाही! त्याच्याबरोबर या संपात आणखीही जे मारले गेले त्यांचे! जे जे जखमी झाले, त्या सगळ्यांचे मारेकरी तुम्ही आहांत!

गिरीश : तू काय बरळतेयस अंजू...? तुला कल्पना तरी आहे का?

अंजू : चांगलीच! तुम्हांला काय वाटतंय, तुमचं पाप फक्त हॅरिसनशिवाय दुसऱ्या कुणाला कळलेलं नाही? मग मी सांगते. मला ते ठाऊक आहे!

गिरीश : पाप? कसलं पाप केलं मी?

अंजू : हा संप– ज्याच्यात ही हत्या झाली, रक्तपात झाला, तो संप तुम्ही घडवून आणला होता! तुम्ही स्वतः!

गिरीश : मी?

अंजू : हो– तुम्ही. बसवाल्यांना आणि युनिअनच्या नेत्यांना पंधरा दिवसांसाठी विकत घेऊन!

गिरीश : मी हा संप घडवून आणला? कशासाठी?

अंजू : जो माल परदेशी जाऊ शकत नव्हता त्याची नुकसानभरपाई द्यावी लागू नये म्हणून!

गिरीश : तुला काय माहीत?

अंजू : मी वाचलंय ते कलम. माझ्याकडूनच पेन घेऊन तुम्ही कॉन्ट्रॅक्ट ॲक्टवर रेघा मारल्यात. रंगास्वामी तक्रार करीत होते त्या दिवशी.

**गिरीश :** त्याच वेळी तू ते वाचलंस ?

**अंजू :** हो. जर एखाद्या कंपनीत संप किंवा तसलीच एखादी आपत्ती ओढवली तर नुकसानभरपाईचं कलम बाद ठरतं. त्यावेळी माझ्या लक्षात त्याचा अर्थ आला नाही. लेबर डिपार्टमेन्टला तुमची बदली झाल्याबरोबर संप सुरू झाला, तेव्हा मला अंधुक शंका आली. बिचारा गोपीनाथ! संप थांबवण्यासाठी तुमच्या विनवण्या करीत होता. संप सुरू होण्याचं कारणच तुम्ही आहात हे त्याच्या कधीच लक्षात आलं नाही. जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा लगेच बाहेर बोलण्याचा मला धीर झाला नाही. कारण तुम्ही घरचे होता. आणि शेवटपर्यंत मला एक पुसटशी आशा होती की तुम्ही या थराला जाणार नाही. माझ्या कल्पनेतला प्राध्यापक गिरीश इतका बदललेला असणार नाही. शेवटी मला राहवेना. मी गोपीनाथकडे हे बोलायचं ठरवलं– पण त्याच दिवशी गोपीनाथ जखमी झाला.

**गिरीश :** कशासाठी केलं मी हे सारं ? कंपनीला दीड कोटीचा धक्का बसला असता– तिचं नाव परदेशात खराब झालं असतं– हे टाळायला नको होतं का मी ?

**अंजू :** कशाला खोटं बोलता गिरीश ? कंपनीसाठी तुम्ही केलंत ते परोपकाराच्या भावनेनं नव्हे. तो एक सौदा होता– तुम्ही कंपनीला वाचवलं असतं, तर तुम्हांला डिरेक्टर करण्याचं वचन दिलेलंच होतं हॅरिसननं. आणि त्याप्रमाणं तुम्ही डिरेक्टर झालात! गोपीनाथसारख्या निःस्वार्थी माणसांचं रक्त सांडून!

( एकदम प्रकाशयोजना बदलते. हलक्या आवाजातलं हास्य ऐकू येतं. )

**गिरीश :** ...अजून...अजून दिसतेय ती कट्यार मला. पण आता त्या कट्यारीच्या पात्यावरून रक्ताचे थेंब निथळू लागले आहेत! हे रक्त अगोदर दिसत नव्हतं. नाही... ही कट्यार नाही...हा भास आहे, केवळ भास आहे! या मॅक्बेथच्या मनातल्या राक्षसी आकांक्षेनंच निर्माण केलेला हा भास आहे! (प्रकाशयोजना बदलते. गिरीश पूर्ववत.) तुला समजायचं नाही अंजू! एमेला अर्थशास्त्र घेतलं म्हणून जगण्याचे प्रॉब्लेम्स समजत नाहीत. या जगात दोनच जाती आहेत अंजू. एक तुडवणाऱ्यांची आणि दुसरी तुडवलं जाणाऱ्यांची. आपण तुडवलं जायला नको असेल तर आपण दुसऱ्यांना तुडवणंच भाग असतं.

**अंजू :** तुमची भाषा मला समजत नाही. पण वाटतं की या जगात दुसऱ्याला न तुडवताही माणसाला जगता आलं पाहिजे. तरच तो माणूस म्हणून जगू शकेल. मग तो मोठा झाला नाही तरी चालेल! (थांबून) म्हणूनच

नकार दिला मी नितीनला! हे सगळं मी त्याला सांगू शकले नाही. कारण तुमच्या कंपनीची सिक्रेट्स फोडणं शक्य नव्हतं मला.

**गिरीश :** थँक्यू...थँक्यू...अंजू प्लीज. प्लीज, हे कुठं बोलू नकोस. आणि कुणाही-कडे बोललीस तरी निदान तुझ्या बाबांकडे बोलू नकोस. त्यांना हा धक्का सहन व्हायचा नाही.

**अंजू :** नाही सांगणार. पण गिरीश...मला मात्र तुम्ही पोरकं करून सोडलंत. ( तिला हुंदका अनावर होतो. ) तुम्ही... तुम्ही माझ्या लेखी फार मोठे होता. आणि आता . नाउ आय हेट यू गिरीश, आय हेट यू..

( बॅग घेऊन रेजी येतो. त्याच्या मागोमाग अंजलीची पिशवी घेऊन अपर्णा. )

**अपर्णा :** मी हिला स्टेशनपर्यंत पोचवून येते. ही गाडीत बसली की मी लगेच परत येते. पण तुम्ही कुठं जाऊ नका हं! बी.एम.सी.चे 'ब्लू स्टोन'मधले दहा टेनन्ट्स आहेत, त्या सगळ्यांना मी कॉकटेलला बोलावलंय आज रात्री.

**गिरीश :** डॅम दोज बॅस्टार्ड्स! मला कुणाचं तोंडसुद्धा बघायचं नाहीये आज रात्री! आय ॲम नॉट इन अ मूड टु ..

**अपर्णा :** असं काय करतोस डार्लिंग? आजच तर सेलिब्रेट करायला हवा सक्सेस? नाही तर त्यांना वाटेल की काही तरी फिशी आहे! इट्स युवर ड्यूटी डार्लिंग! यू ओ देम अ पार्टी! मी अगदी लौकर येते! तोवर तू त्यांना एन्टरटेन कर!

**गिरीश :** ( निदान या क्षणी तरी अंजलीनं जाऊ नये असं वाटून ) अंजली . !

**अंजू :** बाय– गिरीश ( त्या दोघी जातात. )

(बॅग ठेवून रेजी परत आलेला. तो घरात जातो. फोन वाजू लागतो. गिरीश तो उचलतो.)

हलो...! गिरीश पोतदार हिअर! कोण? शशिभूषण मैत्र? ( एकदम विलक्षण एक्साइट होऊन ) मैत्रसाहेब! आय ॲम सो ग्लॅड... थँक्यू! थँक्यू व्हेरी मच! कसं सांगू सर तुम्हांला? नेमकी याच क्षणी तुमच्या आशीर्वादाची मला फार गरज होतं. गुरु म्हणून...आज माझ्या डिरेक्टर-शिपच्या पहिल्या दिवशी तुमचे ब्लेसिंग्स हवेच होते! पण एक सच्चा माणूस म्हणूनसुद्धा! सर, आय ॲम टेरिब्ली डिस्टर्ब्ड! आयुष्याचा अर्थच लागेनासा झालाय मला! म्हणून तुमचा सल्ला हवा होता! सर व्हॉट इज रॉंग विथ ॲम्बिशन? महत्त्वाकांक्षा हे पाप आहे का?.. नाही ना? मला वाटलंच!...काय म्हणालांत?...कळलं सर...हो.. हवं तर परत म्हणून दाखवतो. ( थकल्या आवाजात ) ऑल ॲम्बिशन्स आर

लॉफुल एक्सेप्ट दोज विच क्लाइंब अपवर्ड ऑन द मिझरीज ऑफ मॅनकाइन्ड! ( रिसीव्हर त्याच्या हातून गळून पडतो, आणि तसाच लोंबकळत राहतो. ) महत्त्वाकांक्षा वाईट नाही फक्त आपल्या महत्त्वाकांक्षेचा रथ दुबळ्या असहाय माणसाच्या अंगावरून जाता नये.... बस! मिस्टर शेक्सपिअर, शशिभूषण मैत्रांनीदेखील तुमच्याच बाजूनं कौल दिला. आता झालं ना समाधान? सगळ्या सगळ्यांना एकदा दाखवून द्या की आम्ही तुमच्या मॅक्बेथचेच अवतार आहोत. तितकेच महत्त्वाकांक्षी–तितकेच नीच. पण आता जमाना बदललाय मिस्टर विल्यम . आता आम्ही फार निगरगट्ट झालोय! तुमच्या मॅक्बेथला जसं ठिकठिकाणी बँकोचं भूत भेडसावत होतं, तसं आमचं पाप काही आम्हांला जागोजाग दिसणार नाही...

( वळतो, एवढ्यात त्याला पाठीमागंच गोपीनाथ दिसतो. पांढऱ्याशुभ्र पट्ट्या सर्वांग अंगभर बांधलेल्या. चेहरा झाकलेला. फक्त डोळे आणि ओठ उघडे. चेहऱ्यावर स्मित. तो काहीच बोलत नाही. )

( विलक्षण घाबरून ) गोपीनाथ.. गोपीनाथ तू कसा आलास इथं? या वेळी तू पोस्ट मॉर्टेम रूममध्ये आहेस...तुझ्या शरीराच्या चिंधड्या चिंधड्या करून डॉक्टर्स तुझ्या मरणाचं कारण शोधताहेत.. आणि तू इथं कशाला आलास? माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायला? कुठली महत्त्वाकांक्षा वाईट ते सांगायला? मला कळलं रे गोपीनाथ-- तुझ्या मरणाचं कारण कळलं! माझ्या महत्त्वाकांक्षेच्या अश्वमेधाच्या, चौखूर उधळलेल्या घोड्याच्या टापांखाली, तुडवला जाऊन तू मेलास! माफ कर...मला माफ कर रे! मला माफ कर! ( हमसाहमशी रडत गोपीनाथच्या पायाशी पडतो. )

( दरवाजावरची बेल वाजू लागते. काही क्षण ती तशीच वाजत राहते. जोरजोरानं. गोपीनाथ दिसेनासा झालेला. रेजी बाहेर येतो. गिरीशला कार्पेटवर पडलेला पाहतो. दाराशी जातो. तसाच परत येतो. बेल वाजत राहते. रेजी फोनचा रिसीव्हर जागेवर ठेवतो. )

**रेजी :** ( गिरीशच्या जवळ जाऊन, खाली बसून ) साहेब, पार्टीचे गेस्ट्स यायला सुरुवात झाली. उठता ना?

**गिरीश :** अं... ?

**रेजी :** ( त्याला सावकाश उठवीत ) गेस्ट्सना रिसीव्ह करायला तयार होता ना साहेब? उठा. गेस्ट्स आलेत. तुम्ही तयार राहा साहेब. मी दार उघडायला जातोय.

— पडदा —

IRBK-0119714



नाटक